
रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३४१
www.ramprahar.com
गुरुवार, २९ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

सर्वांनाच आता महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे कवच/२
पनवेल, उरणच्या शाळांमध्ये घुमला विठूनामाचा गजर/३
राउंड रॉबिन पद्धतीने होणार यंदाचा विश्वचषक/८

## ऊसाच्या किमान आधारभूत किमतीत सरकारकडून वाढ



**नवी दिल्ली** : देशातील ऊस उत्पादक शेतकर्‍यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी (दि. २८) झालेल्या बैठकीत ऊसाची किमान आधारभूत किंमत म्हणजेच एमएसपी वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ऊसावरील एमएसपी प्रति क्विंटल १० रुपयांनी वाढविण्यात आली आहे. कृषि लागत आणि मुल्य आयोगाने यापूर्वीच सरकारकडे यासंदर्भात शिफारस केली होती. आता, कॅबिनेटच्या बैठकीनंतर सरकारने यास मंजुरीही दिली आहे. सरकारद्वारे वाढविण्यात आलेली एमएसपी नवीन ऊस हंगामापासून लागू होणार आहे. ऊसाच्या यंदाच्या नवीन हंगामात एमएसपी ३१५ रुपये करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील शेतकर्‍यांन केंद्र सरकारच्या या निर्णयाचा मोठा लाभ होणार आहे.

## चंद्रभागे तिरी फुलला भक्तांचा मेळा...

(छाया : सुधीर नाझरे)



**पंढरपूर : आपल्या लाडक्या विठूरायाला भेटण्यासाठी लाखोंच्या संख्येने वारकरी पंढरीत दाखल झाले आहेत. चंद्रभागेच्या तिरी भक्तांचा मेळा फुलला.**

### कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या संचालकांत घबराट

# अटकपूर्व जामिनासाठी आणखी एकाची धडपड

**पनवेल : प्रतिनिधी**

अटकपूर्व जामिनासाठी आता कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे संचालक रवींद्र श्रावण चोरघे यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याची सुनावणी ४ जुलै रोजी होणार आहे. अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल करणारे चोरघे हे तिसरे संचालक आहेत.

कर्नाळा बँकेतील ५१२.५० कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे येथील आर्थिक शाखेकडून तपास सुरू असून याप्रकरणी





त्यांनी बँकेच्या दोन माजी सीईओंना अटक केल्याने संचालक मंडळातील अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

शेकापचे नेते, माजी आमदार आणि कर्नाळा बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांच्या कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ५१२ कोटी ५४ लाख ५३ हजार रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी त्यांच्यासह संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कर्जदार अशा एकूण ८३ जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर या प्रकरणाचा तपास नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सुरू होता.

या प्रकरणाची व्याप्ती पाहता पोलीस महासंचालकांनी या गुन्ह्याचा पुढील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे येथील आर्थिक शाखेकडे देण्याचे आदेश दिले. त्याच वेळी अध्यक्ष विवेक पाटील यांना ईडीने अटक केली. **(पान २ वर..)**

# राज्यात ४० हजार कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता

### रायगड, नवी मुंबईचा समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पुणे, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नंदूरबार, अहमदनगर, रायगड, नवी मुंबई याभागात ४० हजार कोटी रुपये गुंतवणुकीच्या विशाल प्रकल्पांना उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बुधवारी (दि. २८) झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यात सुमारे एक लाख २० हजार रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



यामध्ये नवी मुंबईच्या महापे येथे होणाऱ्या जेम्स अँण्ड ज्वेलरी पार्क प्रकल्पाला अतिविशाल प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे रायगड येथे परफॉर्मन्स केमिसर्व कंपनीचा २७०० कोटी गुंतवणुकीचा प्रकल्प व २०३३ कोटी गुंतवणुकीच्या स्मार्टकेम टेक्नॉलॉजीज कंपनीचा प्रकल्प उभारणीस मान्यता देण्यात आली आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाची मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव मनोज सौनिक आदी अधिकारी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# रायगडात मुसळधार कायम

**अलिबाग : प्रतिनिधी**

तीन दिवस पडलेल्या पासामुळे रायगड जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले. पोलदपूर तालुक्यात आंबनळी घाटात दोन दरडी कोसळल्या. म्हसळा तालुक्यात २० घरांचे अशंतः नुकसान झाले. अलिबाग तालुक्यात अलिबाग-रेवस मार्गावर झाड पडल्यामुळे या मार्गावरील वाहतूक काही काळ बंद होती. जीवितहानी झाली नाही.

रायगड जिल्ह्यात तीन दिवस चांगला पाऊस पडला. या पावसामुळे भात रोपांना संजीवनी



मिळाली आहे. त्यामुळे शेतीच्या कामांना आता वेग आला आहे, मात्र पावसामुळे जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले.


पोलदपूर तालुक्यात आंबनळी घाटात मंगळवरी दरड कोसळली होती. ही दरड हटविण्यात आली, परंतु बुधवारी पुन्हा याच मार्गावर दरड कोसळली. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा झाला.

म्हसळा तालुक्यात मंगळवारी २० घरांचे अशतः नुकसान झाले. यात जीवितहानी झाली नाही. बुधवारीदेखील अधुनमधून पावसाच्या जोरदार सरी येत होत्या. दुपारनंतर पावसाने विश्रांती घेतली. अलिबाग शहरात सखल भागात पाणी साचले होते.

पुढील चार दिवसदेखील रायगडसह, ठाणे आणि रत्नागिरी, मुंबई आणि सिंधुदुर्गला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. यादरम्यान, या भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे.

## आंबेनळी घाटात दरड कोसळली

### तब्बल दहा तासांनंतर वाहतूक सुरळीत



**पोलादपूर** : आंबेनळी घाटात मंगळवारी (दि. २७) रात्री ११.३० वा. च्या सुमारास दरड कोसळल्याने पोलादपूर-महाबळेश्वर दरम्यान वाहतूक ठप्प झाली होती. बुधवारी (दि. २८) सकाळी दरड हटविण्याचे काम पूर्ण करून या मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली. त्यानंतर पुन्हा घाटामध्ये दरड कोसळली आहे. पावसाचा जोर असल्याने घाटामध्ये मातीचे ओसरे व दगडी वारंवार कोसळू लागल्या आहेत. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने महाबळेश्वर बाजूचा आंबेनळी घाट बंद करण्यात आला आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### पुण्यात दहा लाखांचे ड्रग्ज जप्त, एकास अटक

**पुणे** : पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथक २ने अमली पदार्थ विक्री करणाऱ्या एकास ताब्यात घेतले. मुजाहिद अनवर शेख (वय २५, रा. भवानी पेठ, पुणे) असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून दहा लाख ४० हजारांचे एमडी व एक मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

### मालाडमध्ये झाड पडून एक जण मृत्युमुखी

**मुंबई** : मालाड पश्चिम येथील मामलेदार वाडी जंक्शनजवळ बुधवारी (दि. २८) झाड पडून एकाचा मृत्यू झाला. कौशल दोषी असे मृताचे नाव असून जखमी अवस्थेत त्यांना कांदिवली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत झाल्याचे घोषित केले.

### रायगडचे पर्जन्यमान

**२४ तासांतील पाऊस : ४२.०५ मिमी**
**एकूण पाऊस : २९३.१० मिमी**

# वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूला स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव

### मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब

**मुंबई : प्रतिनिधी**



वर्सोवा वांद्रे सागरी सेतूला स्वातंत्रवीर सावरकर यांचे नाव दिले जाणार असल्याच्या निर्णयावर बुधवारी (दि. २८) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आला आहे, तसेच एमटीएचएलला अटलबिहारी वाजपेयी स्मृती आणि शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू असे नाव दिले जाणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. वांद्रे-वर्सोवा सी लिंकला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव देणार असल्याची घोषणा काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तशी मागणी करणारे पत्र काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांना लिहिले होते. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्र्यांनी वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूला स्वातंत्रवीर सावरकरांचे नाव दिले जाणार असल्याची घोषणा केली होती. मंत्रिमंडळ बैठकीत बुधवारी यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

यासोबतच राज्यात तब्बल ७०० ठिकाणी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू केला जाणार आहे. यासाठी २१० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे भामा आसखेड प्रकल्पाचे कालवे रद्द करण्याचा निर्णयही या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. याचा फायदा तीन तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळणार आहे. जलसंपदा विभागामार्फत हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

# स्वयंचलित हवामान केंद्र देणार आपत्तीची पूर्वसूचना

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूर आणि दरड दुर्घटनांपासून नागरिकांचा बचाव व्हावा यासाठी जिल्हा प्रशासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. पावसाबरोबरच वातावरणातील इतर महत्त्वाच्या घडामोडींच्या नोंदी ठेवण्यासाठी जिल्ह्यात स्वयंचलित हवामान केंद्र उभारली जात आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत ८२ ठिकाणी अशी केंद्र स्थापन करण्यात आली असून त्यामुळे हवामानाचा अचूक अंदाज मिळून नैसर्गिक आपत्तीत होणारी जीवित व वित्तहानी टाळता येणे शक्य होणार आहे.

महाड सावित्री नदीच्या पाणलोट क्षेत्रात २६ ठिकाणी १३ लाख रुपये मंजूर निधीतून स्वयंचलित यंत्र बसवले आहे. त्यामुळे पावसाचा अंदाज येऊन अतिवृष्टीमुळे पुढील होणारे नुकसान काही प्रमाणात थोपवणे शक्य होणार



आहे. सावित्री नदीची धोकादायक पाणी पातळी मोजण्यासाठी दोन ठिकाणी यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत.


**यंत्रणा सक्षमीकरणावर भर**

जिल्ह्याला गेल्या १५ वर्षांत अनेक नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन सक्षम करण्याकडे प्रशासनाने विशेष लक्ष पुरवले आहे. अतिवृष्टी, दरड, पूरस्थिती काळात आपत्ती व्यवस्थापन सक्षम असणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाने सक्षम आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा उभारण्यावर भर दिला आहे.

### *असे चालते काम*

*कृषी विभाग आणि हवामानाचा अंदाज वर्तवणारी स्कायमेट संस्था यांच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात हा उपक्रम राबवला जात आहे. या स्वयंचलित हवामान केंद्रातून कमाल-किमान तापमान, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा ताशी वेग, दिशा, सुर्यप्रकाशाचा कालावधी, पाऊस, बाष्पीभवनाचा वेग, जमिनीचे तापमान, ओलावा याच्या नोंदी सहजपणे उपलब्ध होत असतात. त्यासाठी स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आहे. त्याचा सर्व्हर पुण्यात असून एसएमएसद्वारे ही माहिती सर्व्हरला दैनंदिन पुरवली जाते. यामुळे पावसाचा आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या आपत्तींचा अंदाज येऊन आपत्तीपूर्व उपाययोजना करणे शक्य होते. शिवाय हवामानावर आधारीत शेती करणे किंवा शेतीचे व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे.*

New Jai Bharat Shikshan Prasarak Mandal's
**Shantiniketan Polytechnic**
DTE Code : 3422 | New Panvel | MSBTE Code : 1509
Plot No. 27, Sector-2, New Panvel, Navi Mumbai, Raigad - 410 206
Email : njbspmp@gmail.com Website : www.shantiniketanpolytechnic.com
Approved by AICTE & DTE, Affiliated to MSBTE
शांतीनिकेतन डिप्लोमा इंजिनिअरींग कॉलेज
प्रवेश सुरू
3 जुलै रोजी कॉलेज सुरु !
प्रवेश पात्रता : 10 वी पास
आता डिप्लोमा पास होणं सोपे..!
संपर्क 7208649854
ठळक वैशिष्ट्ये
पनवेल रेल्वे स्टेशन आणि बस स्टॅन्डपासून चालत जाण्याच्या अंतरावर कॉलेज
College is at walkable distance from Panvel Railway Station & Panvel Bus Stand
सर्व सोयीनींयुक्त आकर्षक इमारत
Attractive Infrastructure will all Amenities
सर्वांगिन समतोल विकास साधण्यासाठी ज्ञान-कौशल्य-संस्कार यावर भर
All Rounder Teaching-Learning, Knowledge-Skill & Behavior
मराठी-इंग्रजीमधून अभ्यासक्रम व परीक्षा देता येणार
Marathi-English Syllabus & Examination
इंटरनेट आणि वाय-फाय सुविधा
Internet & Wi-Fi Facilities
प्रात्यक्षिक व इंडस्ट्रीयल ट्रेनिंगवर भर, उद्योजक तयार करण्यावर भर
Practical & Industrial Training



प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ( Document )

| अ.क्र. | कागदपत्रे | Document | Open | SBC/OBC/VJNT | SC/ST |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १० वी ची मार्कशीट | S.S.C Marksheet and Certificate | ✓ | ✓ | ✓ |
| 2 | शाळा सोडलेचा दाखला | Leaving Certificate | ✓ | ✓ | ✓ |
| 3 | नॅशनॅलिटी / डोमेसाईल | Domicile / Nationality Certificate | ✓ | ✓ | ✓ |
| 4 | उत्पन्नाचा दाखला | Income Certificate. | — | ✓ | ✓ |
| 5 | जात प्रमाणत्र | Cast Certificate | — | ✓ | ✓ |
| 6 | नॉन क्रेमिलिअर | Non Creamy layer certificate | — | ✓ | — |
| 7 | बँक पासबुक | Bank Passsbook | ✓ | ✓ | ✓ |
| 8 | आधार कार्ड झेरॉक्स | Aadhar Card | ✓ | ✓ | ✓ |
| 9 | ३ कलर फोटो | Passport size photo - 3 | ✓ | ✓ | ✓ |

COURSES Available for Academic Year 2023-24

| Course Name | | Intake | Choice Code |
|---|---|---|---|
| Civil Engineering | CE | 45 | 342219110 |
| Computer Engg. | CO | 45 | 342224510 |
| Mechanical Engg. | ME | 45 | 342261210 |

Prof. R. G. Patil
Principal
सर्व पात्र विद्यार्थ्यांना फी मध्ये शासकीय सवलत मिळणार
Prof. R. K. Khalane
Vice - Principal
Prof. Sushant Sathe (M.E.*) HOD, Civil Dept. 9833839891
Prof. Gitanjali Sanas (M.E.*) HOD, Comp. Dept. 8796492413
Prof. Rohidas Chaudhari (M.E.) HOD, Mech. Dept. 9309883148

# सर्वांनाच आता महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे कवच

**मुंबई : प्रतिनिधी**

महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना ही राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक, अधिवास प्रमाणपत्र धारण करणार्‍या नागरिकांना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे राज्याच्या सर्व नागरिकांना आरोग्य कवच प्राप्त होणार असून या योजनेंतर्गत आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष दीड लाख रुपयांवरून पाच लाख रुपये एवढे करण्याचा निर्णय बुधवारी (दि. २८) झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

राज्यात यापूर्वी केशरी शिधापत्रिका व अंत्योदय शिधापत्रिका असणार्‍या नागरिकांनाच या योजनेचा लाभ मिळत होता, मात्र यापुढे राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य संरक्षणाचे कवच प्राप्त होणार आहे. विद्यमान महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य या एकात्मिक योजनेत काही बदल करून योजनेचे विस्तारीकरण करून सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे केंद्र व राज्याची एकत्रित योजना राबविणार्‍या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा समावेश झाला आहे.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष पाच लाख रूपये आहे. आता महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गतही आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष पाच लाख रुपये एवढे करण्यात आले आहे.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या एकत्रित अंमलबजावणीमुळे दोन्ही योजनांमध्ये समाविष्ट उपचारांचा लाभ लाभार्थ्याला मिळणार आहे, तसेच दोन्ही योजनांच्या अंगीकृत रुग्णालयांमध्ये उपचार घेता येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९९६, तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये १२०९ उपचार आहेत. आता दोन्ही योजनांमध्ये उपचारांची संख्या १३५६ एवढी करण्यात आली आहे. महात्मा फुले जन आरोग्य व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जनआरोग्य योजना या एकत्रित योजनेमध्ये अंगीकृत रुग्णालयांची संख्या एक हजार एवढी आहे.

### प्रती कुटुंब आता मिळणार पाच लाख रुपये

मूत्रपिंड शस्त्रक्रियेसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये उपचार खर्च मर्यादा प्रती रुग्ण २.५ लाख एवढी मर्यादा आहे. ती आता ४.५ लाख रुपये एवढी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजना ही याआधीच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागात लागू करून सीमेलगतच्या महाराष्ट्र राज्यातील आठ जिल्ह्यांत १४० व कर्नाटक राज्यातील १० अतिरिक्त रुग्णालये अंगीकृत करण्याचा निर्णय झाला आहे. याव्यतिरिक्त २०० रुग्णालये अंगीकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेच्या शासन निर्णयातील तरतुदीमध्ये सुधारणा करून रस्ते अपघातासाठीची उपचारांची संख्या ७४वरून १८४ अशी वाढविण्यात आली आहे. उपचाराच्या खर्च मर्यादेत ३० हजार रुपयांवरून प्रती रुग्ण प्रती अपघात एक लाख रुपये, अशी वाढ करण्यात आली आहे. या योजनेचा समावेश महात्मा फुले जन आरोग्य योजनेत करण्यात आला आहे. यामध्ये राज्याच्या भौगोलिक क्षेत्रातील रस्ते अपघातात जखमी झालेल्या, राज्यातील व देशातील रुग्णांचा समावेश करण्यात आला आहे.

# ‘बेकायदा मच्छीमारांना आळा घालणार’

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टीवरील मच्छीमार बांधवांच्या विविध प्रश्नांसंदर्भात तसेच बेकायदा सुरू असलेल्या मासेमारीबाबत मंगळवारी (दि. २७) मत्स्य व्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे बैठक झाली. या बैठकीस कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व नवी मुंबईतील भाजप आमदार रमेश पाटील, भाजप मच्छीमार सेल अध्यक्ष अ‍ॅड. चेतन पाटील व विविध मच्छीमार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पावसाळ्याच्या हंगामात माशांच्या प्रजनन काळात कोकण किनारपट्टीवर मासेमारी करण्यास बंदी असूनसुद्धा मोठ्या प्रमाणात बेकायदा मासेमारी सुरू असल्याच्या वारंवार तक्रारी होत आहेत. त्यामुळे मत्स्य व्यवसायमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये आमदार रमेश पाटील यांनी कोकण किनारपट्टीवर पावसाळ्याच्या बंदी काळात बेकायदा होत असलेल्या मासेमारीवर बंदी घालण्याची मागणी केली, तसेच अधिकार्‍यांशी संगनमत करून अवैधरित्या मासेमारी सुरू असल्याचे निदर्शनास आणून दिले.

याबाबत ना. सुधीर मुनगंटीवार यांनी, पावसाळी बंदी काळात मासेमारी करणार्‍या बोटी जप्त करण्यात येतील, असे सांगून बेकायदा मासेमारीला प्रोत्साहन देणार्‍या अधिकार्‍यांवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. पोलिसांची मदत घेण्याच्या सूचना मत्स्य व्यवसायमंत्र्यांनी दिल्या असून अवैधरित्या सुरू असलेल्या मासेमारी विरुद्ध कडक कायदे करण्यात येतील, असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले, तसेच मच्छीमार बांधवांच्या तक्रारीकरीता मत्स्यव्यवसाय विभागामार्फत लवकरच टोल फ्री क्रमांक जारी केला जाणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

# वंदे भारत ट्रेनवर पनवेलमध्ये पुष्पवृष्टी

**पनवेल : प्रतिनिधी**

गोव्याहून पनवेलला आलेल्या वंदे भारत एक्सप्रेसचे पनवेल रेल्वे स्थानकात जोरदार स्वागत करण्यात आले. मंगळवारी सायंकाळी पनवेल रेल्वे स्थानकात वंदे भारत एक्सप्रेस येताच गाडीवर पुष्पवृष्टी करून आणि ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्यासह पनवेलकरांनी मोठी गर्दी केली होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोवा-मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा कंदील दाखवला. त्यानंतर ही वंदे भारत एक्स्प्रेस गोव्याहून मुंबईच्या दिशेकडे निघाली. रत्नागिरीतून या गाडीतून राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण प्रवास करीत होते. पनवेल स्टेशनवर पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुण भगत, माजी नगरसेवक नितीन पाटील अजय बहरा, तेजस कांडपिळे, मुकीद काझी, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, राजश्री वावेकर, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते त्याचप्रमाणे पनवेल प्रवासी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड. मनोज भुजबळ, सदस्य डॉक्टर मनीष बेहेरे, उपेंद्र मराठे, अशोक आंबेकर आणि रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, एकाच वेळा पाच नव्या वंदे भारत एक्स्प्रेसला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज हिरवा झेंडा दाखवला. त्यांनी देशाची सूत्र हातात घेतल्यापासून देश प्रत्येक क्षेत्रात भव्य उड्डाणे घेत आहे. झेप घेत आहे, याची चुणूक ही वंदे भारत एक्स्प्रेस दाखवत आहे. ज्या पद्धतीने रेल्वे खाते कात टाकते आहे, त्यामुळे येणार्‍या काळात रेल्वेची सेवा अधिकाधिक चांगली व्हावी आणि सर्व सामान्यांना रेल्वे एक विश्वासू आणि आरामदायी अशा पद्धतीच्या प्रवासाचा पर्याय वाटतो तो असाच पुढच्या कालावधीत अत्याधुनिक व्हावा.

सोयीसुविधांमध्ये वाढ व्हावी आणि प्रवासी या सेवेच्या माध्यमातून देशभरात जोडले जावेत, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी या खात्याचे मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे आभार व्यक्त करून रायगड जिल्ह्यामध्ये ही लवकरात लवकर रेल्वेच्या अधिकाधिक चांगल्या सुविधा मिळोत, अशी अशा व्यक्त करतो. आज आम्हाला दिलेल्या या भेटीबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

# सोसायटीमध्ये दहशत पसरवणारा जेरबंद


**पनवेल : वार्ताहर**

काही दिवसांपूर्वी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निल आंगण सोसायटीमध्ये भारत सरकारने बंदी घातलेल्या संघटनेचा मजकूर सोसायटीमधील घरांच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ लिहून व मोकळ्या भिंतीवर दोन सुतळी बॉम्ब तसेच विझवलेली अगरबत्ती बांधून ठेवली होती. या प्रकरणत ६८ वर्षीय व्यक्तीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दहशतीचे वातावरण पसरविणार्‍या व्यक्तीला पकडण्यासाठी पोलिसांकडून चार विशेष तपास पथक तयार करण्यात आले होते. गुन्ह्याचा तपास सुरू असताना एक व्यक्ती हा गुन्हा दाखल झाल्यापासून पोलीस तपासाचा मागोवा घेत असल्याचे पोलिसांना जाणवले. त्याची सखोल चौकशी केली असता एका पदाधिकार्‍याने तो सेक्रेटरी असल्याचे सांगून सोसायटीच्या पदाधिकारी व सदस्यांमध्ये वाद असल्याने रहिवाशांना त्रास व्हावा या हेतूने त्याने हे कृत्य केल्याचे कबुल केले. त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

# धाकटी पंढरीत हजारो भाविक दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**


(छाया : जयवंत माडे)

खोपोलीजवळील ताकई-साजगांव येथील धाकटी पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या ऐतिहासिक विठ्ठल मंदिरात गुरुवारी (दि. २९) साजर्‍या होणार्‍या आषाढी एकादशीनिमित्त हजारो भाविक बुधवारीच दाखल झाले. वारकरी व सर्वसामान्य भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून धाकटी पंढरी देवस्थान समितीकडून आवश्यक सर्व नियोजन करण्यात आले असल्याचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी सांगितले.

आषाढी एकादशीला लाखो वारकरी पंढरपूरला विठुरायाच्या दर्शनासाठी जातात, मात्र रायगड जिल्ह्यातील ज्यांना पंढरीला जाण्याचे शक्य होत नाही, असे हजारो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी धाकटी पंढरीला येतात. जगत्‌गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या मंदिरात आषाढी एकादशी तसेच इतर दिवशीही भाविकांची वर्दळ सुरू असते. गुरुवारी सकाळी ४ वाजता यथोचित महापूजा व काकड आरती झाल्यावर दर्शनासाठी हे मंदिर खुले होईल. ५० हजारांपेक्षा जास्त भाविक आषाढीनिमित्त दर्शनासाठी येतील, असा अंदाज देवस्थान कमिटी व व्यवस्थापकांना आहे. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी खोपोली पोलीस सज्ज असल्याचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी सांगितले.

पान १ वरुन

## राज्यात ४० हजार कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता-मुख्यमंत्री शिंदे

पुणे, छत्रपती संभाजीनगर येथे गोगोरो इंडिया प्रा. लि. कंपनीमार्फत इलेक्ट्रीक व्हेईकल व बॅटरी निर्मिती तसेच स्वॅपिंग स्टेशन इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी करण्यात येणार आहे. हा देशातील पहिला प्रकल्प ठरणार असून त्यास अतिविशाल प्रकल्प म्हणून मान्यता देण्यात आली. गोगोरो संपूर्ण महाराष्ट्रात आगामी काळात सुमारे १२ हजार बॅटरी स्वॅपिंग स्टेशन्स स्थापन करणार आहे. त्यामुळे राज्यात इलेक्ट्रिक व्हेईकल पायाभूत सुविधा आणि ईव्हीच्या वापराला चालना मिळणार आहे.

जेम्स अँड ज्वेलरी आर्ट प्रमोशन कॉन्सिलद्वारे नवी मुंबई येथील महापे येथे स्थापित होणार्‍या इंडिया जेम्स अ‍ॅन्ड ज्वेलरी पार्क प्रकल्पाला अतिविशाल प्रकल्प म्हणून दर्जा देण्यात आला. सुमारे २१ एकर जागेवर इंडिया ज्वेलरी पार्क होणार आहे. १,३५४ औद्योगिक व व्यापारी आस्थापना या ठिकाणी सुरू होतील.

छत्रपती संभाजीनगर येथे इलेक्ट्रिक व्हेईकल्स व बॅटरीची निर्मिती करणार्‍या इथर एनर्जी कंपनीद्वारे ८६५ कोटी गुंतवणुकीच्या विशाल प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. एथर एनर्जी ही भारतातील आघाडीच्या इलेक्ट्रिक वाहन उत्पादकांपैकी एक आहे. जी प्रगत आणि कनेक्टेड इलेक्ट्रिक दुचाकी बनवते. या प्रकल्पामुळे राज्यामध्ये पुरवठादार इको सिस्टीम स्थापन होण्यास मदत होणार आहे, तसेच पुणे येथे देशातील पहिल्या ई-बस निर्मितीच्या ७७६ कोटी गुंतवणूकीच्या पिनॅकल मोबिलिटी सोल्युशन्स प्रा. लि. या घटकाच्या विशाल प्रकल्पास मान्यता देण्यात आली. पुणे येथे पिनॅकल मोबिलिटी सोल्युशन्स या घटकाकडून भारतातील सर्वात प्रगत तांत्रिकदृष्ट्या प्रगत व्यावसायिक इलेक्ट्रिक आणि सदर हायड्रोजन इंधन-सेल वाहन निर्मिती सुविधा उभारण्यात येणार आहे. इलेक्ट्रीक व्हेईकल आणि नवीन ऊर्जेवरील वाहने पुढील दशकात देशातील उत्पादन उद्योगात सर्वात मोठे योगदान देणार आहे. घटकामार्फत उभारला जाणारा प्रकल्प पुणे येथे इलेक्ट्रिक व्हेईकल आणि हायड्रोजन हब बनू शकतो.

जनरल पॉलिफिल्मस कंपनीचा ५०० कोटी गुंतवणुकीचा प्रकल्प नंदूरबार येथे, विप्रो परी रोबोटिक्स कंपनीचा ५४४ कोटी गुंतवणुकीचा प्रकल्प सातारा येथे तर ११० कोटी गुंतवणुकीचा गणराज इस्पात कंपनीचा प्रकल्प अहमदनगर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्रात रत्ने व आभूषणे क्षेत्रातील घटकांसाठी एकात्मिक सुविधा विकसित करण्यासाठी तसेच गुंतवणूक, उत्पादन, रोजगार, व्यापार आणि निर्यात यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एकूण २०,००० रु. कोटीची गुंतवणूक अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे सुमारे एक लाख रोजगार निर्मिती होणार आहे. जागतिक स्तरावर जेम्स ॲण्ड ज्वेलरी उत्पादनांची निर्यात वाढण्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळणार असून प्रस्तावित इंडिया ज्वेलरी पार्क प्रकल्पांतर्गत जोडप्रकल्प म्हणून वेगाने विकसित होत असलेल्या लॅब ग्रोन डायमंड उद्योगावर विशेष भर देण्यात येणार आहे. त्याद्वारे मेगा पार्क फॉर लॅब ग्रोन डायमंडस विकसित करण्याचे नियोजन आहे. बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, वस्त्रोद्योग विभागाचे सचिव विरेंद्र सिंग, औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा, उद्योग विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह आदी उपस्थित होते.

## अटकपूर्व जामिनासाठी आणखी एकाची धडपड

गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे येथील आर्थिक शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त (एसीपी) मिना जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू झाल्यावर बँकेच्या सीईओ अपर्णा वडके यांना अटक करण्यात आली. त्या वेळी विवेक पाटील यांचे चिरंजीव व बँकेचे संचालक अभिजीत विवेकानंद पाटील यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. तो जिल्हा न्यायालयाने फेटाळला. आता त्यांनी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यावर शुक्रवारी (दि. ३०) सुनावणी होणार आहे.

जिल्हा न्यायालयाने अभिजीत पाटील यांचा अर्ज फेटाळल्यावर बँकेचे दुसरे सीईओ हेमंत सुताने यांना अटक करण्यात आली. त्यामुळे संचालक मंडळात घबराट पसरली असून आपल्याला केव्हाही अटक होऊ शकते, या भीतीने संचालक सुभाष मधुकर देशपांडे यांनी जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. त्यावर बुधवारी (दि. २८) सुनावणी होणार होती, पण त्याच वेळी आणखी एक संचालक रवींद्र श्रावण चोरघे यांनीही जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केल्याने आता दोन्ही अर्जावर ४ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.

## आंबेनळी घाटात दोन ठिकाणी दरड

त्यामुळे पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याच्या सूचना प्रशासनाच्या वतीने देण्यात आल्या आहेत.

महाबळेश्वर आणि पोलादपूर परिसरात सुरू असेलेल्या संततधार पावसामुळे, आंबेनळी घाटात कालिका मंदिराजवळ मंगळवारी रात्री ही दरड कोसळली. याबाबतची माहिती मिळताच, प्रशासकीय यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या होत्या, मात्र रात्रीच्या काळोखात दरड हटविण्याचे काम करणे शक्य नसल्याने, दोन्ही बाजूची वाहतूक सकाळपर्यंत बंद ठेवण्यात आली होती.

बुधवारी सकाळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्‍यांनी दरड हटवण्याचे काम तातडीने सुरू केले. पावसामुळे पाण्यासोबत लहान-मोठे दगड आणि मातीचे ढिगारे ओघळून खाली येत होते. जेसीबीच्या साहाय्याने हे ढिगारे हटवण्याचे काम सुरू करण्यात आले. दरड हटविल्यानंतर आंबेनळी घाटरस्त्याला मोठमोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले. या भेगांमध्ये पावसाचे पाणी शिरून भेगा रूंदावल्यास अर्धाअधिक घाटरस्ता दरीत कोसळण्याची शक्यता दिसून आल्याने दरडी हटविल्यानंतर या ठिकाणी डांबर ओतून भेगा बुजविण्यात आल्या. यानंतर वाहतूक सुरू करण्यात आल्याची माहिती पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांनी दिली.

दरम्यान जिल्ह्यात पावसाचा जोर कायम असल्याने घाट मार्गावरून प्रवास करताना वाहनचालकांनी खबरदारी बाळगावी असे आवाहन प्रशासनाने केले आहे. घटनास्थळी पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे, महाड डीवायएसपी शंकर काळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज म्हसकर, बांधकाम अभियंता, कर्मचारी, नरवीर रेस्क्यू टीमचे सदस्य आपत्कालीन साहित्यसह उपस्थित असून दरडी हटवण्यात आल्या आहेत, मात्र पुन्हा दरडीचा धोका कायम आहे.

# ‘सीकेटी’च्या एनसीसी विभागातर्फे विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात नॅशनल कॅडेट्स कौर (एनसीसी) विभागाद्वारे रविवारी (दि. २५) जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. यू. टी. भंडारे यांच्या नेतृत्वाखाली मोरबे धरण परिसरास भेट देण्यात आली.

या वेळी कॅडेट्सनी या परिसरात आलेल्या पर्यटकांना पर्यावरण संवर्धनाची गरज व महत्त्व सांगून जनजागृती केली. या भेटीमध्ये ५६ कॅडेटस् सहभागी झाले होते.

आंतरराष्ट्रीय अमली पदार्थविरोधी दिनानिमित्त सोमवारी (दि. २६) विभागाद्वारे जनजागृतीसाठी महाविद्यालयाच्या परिसरात रॅली काढण्यात आली. या वेळी प्रमुख प्रो. डॉ. यू. टी. भंडारे आणि इतर प्राध्यापक उपस्थित होते. या रॅलीमध्ये कॅडेट्सनी पत्रके व घोषणा देऊन जनजागृती केली. यामध्ये ६४ कॅडेट्स् सहभागी झाले होते.

या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले.

## पावसाळ्यातील आजार टाळण्याकरिता आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

पावसाळी कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे. वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत घ्यावयाच्या खबरदारीविषयी जनजागृती विविध माध्यमांतून करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करून नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.

पावसाळ्यामध्ये नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे, तसेच भाज्या, फळे इत्यादी वस्तू स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापराव्यात, सर्व केरकचरा घंटा गाडीतच टाकावा, घर व सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा. साचलेले पाणी, डबकी यातील पाणी वाट काढून वाहून जाईल अशी सोय करावी जेणेकरून डास उत्पन्न होणार नाहीत. अतिसार झाल्यास क्षारसंजिवनी मिश्रणाचा वापर करावा, अशा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिल्या आहे.

रुग्णालयांनी, प्रयोगशाळांनी साथीच्या रोगाचे रुग्ण महापालिकेला panvelmoh@gmail.com या ईमेल आयडीवर कळवावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पाणीपुरवठा योजनेतील कडसुरे सरपंचांचा भ्रष्टाचार उघड

**नागोठणे : बातमीदार**

कडसुरे सरपंच राजेंद्र शिंदे यांना कोकण विभागीय आयुक्तांनी गावातील नळ पाणीपुरवठा योजनेतील भ्रष्ट्राचारप्रकरणी दोषी ठरवत मंत्री ग्रामविकास मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात आलेल्या सुनावणीअंती सरपंच व सदस्य पदावरूनही काढून टाकण्यासंदर्भात देण्यात आलेला आदेश कायम ठेवत पुढील कार्यवाहीसाठीचा आदेश दिले आहेत.

याप्रकरणी गटविकास अधिकारी रोहा यांचेकडे सरपंच राजेंद्र शिंदे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावा, तसेच अपहरीत १६,३०९८७ रु. इतकी रक्कम वसूल करावी यासाठी पत्रव्यवहार केला होता. कडसुरे नळपाणीपुरवठा योजनेतील ४९ लाख ५४ हजार ६६१ रकमेची निविदा न वापरता कायद्यानुसार भंग केल्याचे दिसून येत आहे, तसेच सरपंच राजेंद्र शिंदे यांनी बँक ऑफ इंडियाच्या नागोठणे शाखेतून ११ फेब्रुवारी २०२० रोजी तीन लाख ५० हजार व १३ फेब्रुवारी २०२० रोजी दोन लाख स्वतःच्या नावे काढून आर्थिक घोटाळा केल्याचे स्पष्ट होत असल्याचे आदेशामध्ये म्हटले आहे.

ग्रामस्थ महेश शिंदे, दिलीप शिंदे, दत्तात्रेय शिंदे, पांडुरंग शिंदे व इतर ग्रामस्थांनी २६ डिसेंबर २०१९ रोजी रोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. सरपंच राजेंद्र शिंदे हे भ्रष्टाचाराबाबत जबाबदार असल्याचा अभिप्राय राजिप मुख्य कार्यकारी अधिकार्‍यांनी कोकण आयुक्तांना दिला होता. आयुक्त विलास पाटील यांनी चौकशी करून हे आदेश पारित केले होते, मात्र सरपंच राजेंद्र शिंदे यांनी ग्रामविकास मंत्रालयाच्या न्यायालयात अपील दाखल केली होती. यावर सुनावणी होऊन राजेंद्र शिंदे यांना या भ्रष्टाचारप्रकरणी दोषी ठरविण्यात आले आहे.

# शाळांमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

## गव्हाण विद्यालयात विठ्ठल-रखुमाईची पालखी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी व विठ्ठल रखुमाई यांच्या प्रतिमांची पालखी मिरवणूक काढून वृक्ष संवर्धनाचा जयघोष केला.

सकाळी विद्यालयाच्या प्रांगणात विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी यांनी विठ्ठल रुखुमाईच्या मूर्तीसह सजविलेल्या पालखीचे पूजन करून वृक्षदिंडी मार्गस्थ केली. तत्पूर्वी विद्यालयाच्या प्रांगणातून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन. घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यार्थ्यांचीही वृक्षदिंडी मार्गस्थ झाली. विद्यालयाचे पर्यवेक्षक जोशी सर आणि सर्व सेवक वृंद यावेळी उपस्थित होता.

या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, विश्वनाथ कोळी, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, मुख्याध्यापक पी.बी.मंडळे, भोईर सर, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती आणि जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे तसेच दोन्ही शाखांचे सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृक्षदिंडीची सांगता विद्यालयाच्या प्रांगणात विठ्ठल रुक्खमाई च्या आरती आणि भजनांनी झाली. विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे यांनी केलेल्या सुरेल आरती गायनाने भक्तीमय वातावरण निर्मिती झाली. विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने वृक्षदिंडीचे नेटके आणि आकर्षक आयोजन केले.



(छाया : योगेश पाटील)

## फडके विद्यालयात अवतरले अवघे पंढरपूर



**पनवेल : प्रतिनिधी**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागात आषाढी एकादशी बुधवारी साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका मनिषा महाजन यांच्या हस्ते विठुरायाचे प्रतिमापूजन व पालखीपूजन करण्यात आले.

विठ्ठलाच्या आरतीने तसेच नामघोषाने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि सभागृह विठ्ठलाच्या नामघोषाने दुमदुमून गेले. वेदिका थोरात या विद्यार्थीनीने आषाढी एकादशीची माहिती सांगितली. त्यानंतर आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, पुंडलिक, तुकाराम, एकनाथ, कान्होपात्रा व नामदेव या संतांच्या शिकवणी वर आधारित नाटक व अभंगाचे सादरीकरण केले.

माजी विद्यार्थीनी तन्वी व अवनी मिनासे यांनी अभंग सादर करून सर्व वातावरण पंढरीच्या नामघोषात तल्लीन केले. पर्यावरण संवर्धन दिंडी सेक्टर ६च्या परिसरात आयोजित केली होती, परंतु अतिवृष्टीमुळे पर्यावरणपूरक संदेश देणारे घोषफलकांसह ध्वज व तुळशी घेऊन विद्यालयाच्या आवारातच टाळांच्या गजरात काढण्यात आली.

क्रीडा शिक्षिका वैभवी मराळ यांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थित पालकांचे कौतुक करून संतांच्या शिकवणीचा अवलंब आपल्या जीवनात करण्याचे आवाहन केले.

## 'सीकेटी'त विठ्ठल रुक्मिणीचा जयघोष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) प्राथमिक विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्ताने दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या दिंडी सोहळ्यात विद्यार्थी वारकरी वेशभूषा परिधान करून तर, विद्यार्थिनी डोक्यावर तुळस घेऊन दिंडीत सामील झाल्या होत्या. सुंदर अशा लेझीम पथकाने दिंडीची सुरुवात झाली. विठ्ठल रुक्मिणीचा जयघोष करीत, यावर्षीही रिमझिम पावसाच्या सरींमध्ये, विद्यार्थ्यांनी दिंडी सोहळ्याचा आनंद घेतला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सुभाष मानकर यांनी दिंडी सोहळ्यात सहभागी होऊन दिंडीची शोभा वाढवली. सरांनी विद्यार्थ्यांसोबत विठ्ठल नामाचा-गजर केला. या वेळी विद्यालयाच्या संगीत शिक्षिका अर्चना पाटील व संगीत शिक्षक संतोष खरेसर यांनी मुलांसमवेत विठुमाऊलीचा गजर सादर केला. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे तोंड भरून कौतुक केले.



## छोट्या वारकऱ्यांची सीकेटी शाळेला प्रदक्षिणा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमात मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली संकुलात आषाढी वारीचे नियोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रखुमाई यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. या कार्यक्रमात विद्यार्थी वारकरी वेशभूषा करून आले होते. शिक्षक व विद्यार्थ्यांनी जय जय विठोबा रखुमाई या जयघोषात संपुर्ण शाळेला प्रदक्षिणा घातली. तसेच टाळ, वीणा व मृदंगाच्या तालावर ठेका धरून हरीनामाच्या गजरात असे तल्लीन झाले जणु पंढरीच्या विठूरायाचे साक्षात दर्शन झाले.



## बीसीटी विद्यालयात विविध कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीचे पूजन करून आषाढी एकादशीच्या सोहळ्यास सुरुवात झाली. एकादशीनिम्मित शाळेमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले होते. त्यात दिंडी, रिंगण, लेझीम नृत्य, भजन व इत्यादी कार्यक्रमांचे खास आकर्षण होते.



शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी व वारकऱ्यांचे वेश धारण केल्यामुळे शाळेचे रुपांतर मंदिरात झाले होते. मुले टाळ, मृदुंग व विठ्ठलाच्या नामात रंगून गेली होती. इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी गोल रिंगण करून पारंपारिक खेळाचे प्रत्याक्षिक केले. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी सहभाग घेवून शाळेजवळील भूपाळी, मल्हार सोसायटी परिसरामध्ये दिंडी काढली. परिसरातील नागरिकांनीदेखील पालखीचे पूजन केले. विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. दिंडीतील सहभागी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप देखील केला.

आषाढी एकादशीचे औचित्य साधून शाळेत वृक्षरोपणाचा कार्यक्रम देखील पार पडला. विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात विविध फळ फुल झाडांची लागवड केली.

## जासई विद्यालयात विठ्ठल पालखीचे पूजन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज या शैक्षणिक संकुलात आषाढी एकादशी निमित्त वारी आणि वृक्ष दिंडी कार्यक्रम झाला.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील हे लाभले होते तसेच नरेश घरत आणि विद्यालयाचे प्राचार्य रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर अरुण घाग यांच्या हस्ते वृक्षदिंडी आणि पालखीचे पूजन केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वारकरी वेषात विठ्ठल नामाच्या गजरात पालखी आणि वृक्षदिंडी गावभर फिरवीली.

या कार्यक्रमासाठी मधुकर पाटील, यशवंत घरत, रघुनाथ ठाकूर, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका एस. सी. म्हात्रे, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख एस. एस. शिंदे, गुरुकुल प्रमुख एस. पी. ठाकरे आणि सर्व सेवक व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

## स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेचा दिंडी सोहळा

**पनवेल : प्रतिनिधी**

आषाढी वारीनिमित्त नवीन पनवेलच्या स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेने बुधवारी (दि. २८) दिंडी सोहळा आयोजित केला होता. दरवर्षीप्रमाणे यावर्षी ही संस्थेच्या सर्व सहकारी मैत्रिणी यांच्या सहकार्याने नवीन पनवेल सेक्टर १६ मधील गार्डनमध्ये विठुरायाच्या नामघोषाने भक्तिमय वातावरणात झाला.

यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर कीर्ती समुद्रे, गडकरी मॅडम उपस्थित होत्या. दिंडी सोहळ्याचा निमित्ताने गार्डनमधील उपस्थित नागरिकांना प्लास्टिक मुक्त पनवेलसाठीसंस्थेतर्फे कापडी पिशव्यांचे वाटप डॉ. कीर्ती समुद्रे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी स्वच्छंद टीमचे सभासद व मैत्रिणी उपस्थित होते.संस्थेच्या पदाधिकारीनीता घाटूगडे, सुलभा मोरे, संध्या भुजबळ व स्वाती गरुड यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.



## सीकेटी माध्यमिक विद्यायतात वृक्षदिंडी सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशी - पालखी सोहळा, वृक्षदिंडी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षदिंडी, पालखी सोहळा, वृक्षारोपण, अभंग, गजर अश्या कार्यक्रमाचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण वातावरणात केले. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव श्री. गडदे, सहाय्यक चर्निरोड शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या शिक्षण उपनिरीक्षक निशा वैदू यांच्या हस्ते पालखी-पूजन झाले संत ज्ञानेश्वर माऊली प्रतिमा पूजन झाले, पारंपारिक पद्धतीने काढलेल्या दिंडीमुळे शाळेला जणू पंढरीचे स्वरूप आल्यासारखे भासत होते. विद्यार्थ्यांनी केलेल्या विठ्ठल-रखुमाईच्या वेशभूषेने हा सोहळा अधिक रंगला, विठ्ठल नामाच्या गजराने सोहळा बहरला, वृक्षारोपण कार्यक्रमातून विद्यार्थ्यांस वृक्षसंवर्धनाचे महत्त्व समजले.



आषाढी एकादशी वृक्षदिंडी पालखी सोहळा विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, विद्यालयाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, तसेच उच्च माध्यमिक विद्यालायाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यम-माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यम - प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, निलिमा शिंदे, वैशाली पारधी अन्य विभाग प्रमुख कार्यक्रमास उपस्थित होते.

## दापोली-पारगाव विद्यालयात पालखी मिरवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या, अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथशेठ जितेकर ज्युनियर कॉलेज, दापोली - पारगाव येथे मंगळवारी (दि. २७) आषाढी एकादशी निमित्त पालखी मिरवणूक सोहळा व वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य धनराज पाटील, इतर सदस्य व तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पी. आर. ठाकूर, उपमुख्याध्यापक डी. डी. भरणुके, पर्यवेक्षिका के. एन. अतितकर व सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



पालखीचे पूजनानंतर ढोल ताशांच्या गजरात पालखी मिरवणूक विद्यार्थ्यांसमवेत दापोली व पारगाव या दोन गावांमधून निघाली. पालखीसोबत विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर नृत्य सादर केले. मिरवणुकीसाठी विद्यार्थ्यांनी सुंदर असा पारंपारिक वारकरी वेशभूषा परिधान केल्या होत्या. दापोली-पारगाव गावातील ग्रामस्थांनी पालखीचे जोरदार स्वागत केले. वृक्षदिंडीतून झाडे लावा-झाडे जगवा असा सामाजिक संदेश ही यावेळी विद्यार्थ्यांकडून देण्यात आला. चेअरमन प्रकाश जितेकर यांच्यामार्फत खाऊची व्यवस्था या वेळी करण्यात आली होती.

या कार्यक्रमासाठी कल्याणी भोपी, आर. पी. ठाकूर व डी. एम. फडके यांनी लेझीम नृत्य व वारकरी नृत्याची तयारी करून घेतली तर सांस्कृतिक विभागप्रमुख एम. एम. पाटील यांनी मुख्याध्यापकांच्या आदेशानुसार कार्यक्रमाचे नियोजन केले. सर्व सेवकांनी व विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वीपणे झाला.

## कामोठ्याच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये विठुनामाचा गजर

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्यूनिअर कॉलेज, आषाढी एकादशीनिमित्त घेण्यात आलेलया व कार्यक्रमात विठ्ठल नावाच्या गजरात न्हाऊन निघाल.

विद्यालयात आज सर्वत्र भक्तीमय वातावरण होते, आषाढी एकादशीचा सोहळा उत्साहात झाला. विद्यार्थी वारकरी पोषाखात तर विद्यार्थिनींनी नऊवारी साडी, अशा पारंपारिक, पोशाखामध्ये सहभागी झाले होते. विठ्ठल मूर्तीच्या पूजनाने या भक्तीमय सोहळ्यास प्रारंभ झाला, त्यानंतर आषाढी एकादशीचे महत्त्व विद्यार्थी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून सांगितले.



विद्यार्थ्यांनी अतिशय तालबद्ध अशी लेझीम सादर केली. या नयनरम्य सोहळ्यात सर्व विद्यार्थी विद्यार्थीनींनी खूपच आनंद लुटला.

विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच आपल्या पारंपारिक संस्कृतीचे महत्त्व कळावे या हेतूने अशा सोहळ्यांना नेहमीच मार्गदर्शन करणाऱ्या विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले, तसेच परंपरा ही अधुनिकतेची जोड आहे, असेही मत व्यक्त केले. या वेळी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका कुसुम प्रजापती, सारिका लाजूरकर, नेहा खन्ना तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनी सहभागी झालेले होते.

## संपादकीय


# तुझे रूप चित्ती राहो...

त्या सावळ्या विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने गेले काही दिवस ऊन-पावसाची तमा न बाळगता लाखो पावले पंढरपूरच्या दिशेने चालत राहिली आहेत. आज आषाढी एकादशी. परब्रह्माशी अद्वैत साधण्याचा सोहळा पंढरीत रंगलेला आहे. आणि जे तिथे जाऊ शकलेले नाहीत अशा इतरही असंख्य महाराष्ट्रीय मनांमध्ये विठुराया रुजलेला आहेच...

**वारी आणि वारकरी ही या महाराष्ट्रभूमीच्या ठळक ओळखींपैकी एक. शेकडो वर्षे सुरू असलेली ही परंपरा परमेश्वराच्या आराधनेचा एक आगळा मार्ग सांगणारी. कोणीही आमंत्रण न देता वर्षानुवर्षे लाखो वारकऱ्यांची पावले विठ्ठलनामाचा गजर करत पंढरपूरकडे वळतात. भोळेभाबडे भक्तगण विठुरायाला आवडतात. त्यांच्या भेटीची ओढ पंढरीनाथालाही लागलेली असते असे वर्णन अनेक अभंगांतून आढळते. संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'भेटी लागी जीवा, लागलीसे आस' असे म्हणत शेतीच्या, प्रपंचाच्या अवघ्या विवंचना निग्रहाने मागे ठेवून गोरगरीब शेतकरी, आयाबाया तसेच मोठ्या संख्येने नोकरदार मंडळीही वारीत सहभागी होतात. राज्यभरातून निघालेल्या दिंड्यांमधील चैतन्य अनुभवण्यासाठी एरव्ही वारकरी पंथाची नसलेली मंडळीही चार पावले त्यांच्यासोबत चालतात. मुक्कामाच्या ठिकाणी वारकऱ्यांना जेवू घालण्यात समाधान मानणाऱ्यांची लगबग दिसते. वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी, गरज पडल्यास त्यांना वैद्यकीय सेवा पुरवण्यासाठी अनेक सेवाभावी संस्थांचाही गावोगावी मुक्काम असतो. लांबवरून दिसणाऱ्या भगव्या पताका, संतांच्या पालख्या, विठुनामाचा आणि अभंगांचा गजर अशा या भारावून टाकणाऱ्या सोहळ्याची कीर्ती जगभरात पसरल्याने अनेक विदेशी पर्यटकही आवर्जून त्याचा अनुभव घेण्यासाठी येतात. विठुराया हे जनसामान्यांचे दैवत आहे. त्याच्या ठायी सोवळ्याओवळ्याचा कसलाही बडिवार नाही. उलट सगळ्या जातिपातीचे लोक, भिन्न पंथ आणि संप्रदायांतील लोक एकत्र वाट चालत पंढरी गाठतात. पंढरीत तर तो परमात्मा परमेश्वर आणि सर्वसामान्य माणसे यांचे एक अत्यंत विस्मयकारक असे अद्वैत अनुभवायला मिळते. जणु अवघा महाराष्ट्रच मनाने पंढरीत अवतरतो. लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडणाऱ्या या सोहळ्याचे कौतुक अनेक समाजशास्त्रज्ञांनाही वाटत आले आहे. इतकी अलोट गर्दी, पण सारे कसे स्वत:सोबतच शेजारच्या व्यक्तीचीही काळजी घेत. सहिष्णुतेची, सामंजस्याची ही संतांची शिकवणच या महाराष्ट्र भूमीला पिढ्यानपिढ्या समाज म्हणून एकसंध ठेवत आली आहे. मधल्या कोरोना काळात जनसामान्यांच्या वारीत खंड पडला, पण वारकऱ्यांनी त्याकडेही सामंजस्यानेच पाहिले. परंपरेप्रमाणे पालख्या पंढरीत पोहोचल्या. यंदाची वारी ही झुरणीची वारी आहे. आपण विठुरायासाठी झुरायचे आणि तो आपल्यासाठी, असे म्हणत गावोगावचे वारकरी तिथूनच आपल्या लाडक्या विठुरायाशी हितगुज करते झाले. भक्त आणि विठुरायांमध्ये अंतराय निर्माण करणारा तो कालखंड आता विस्मरणात गेला आहे. अभावातही भाव जपावा ही संतांची शिकवण आहेच. अभंगा-अभंगांतून सांगितले गेलेले आध्यात्म हा तर महाराष्ट्राचा केवढा मोठा सांस्कृतिक ठेवा. आजच्या चंगळवादी जीवनशैलीत गुरफटलेली मने अनेकदा गोंधळून जातात, आयुष्याविषयी पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागतात, तेव्हा त्यांना अभंगांमध्ये त्यांची उत्तरे सापडतात. म्हणूनच तर हे शब्दांचे धन आजही काळाच्या पडद्याआड गेलेले नाही. आषाढी एकादशीच्या निमित्ताने ठिकठिकाणी अभंगवाणीचे सांगितिक कार्यक्रम होतात. 'तुझे रूप चित्ती राहो, मुखी तुझे नाम, देह प्रपंचाचा दास, सुखे करो काम' म्हणत पावले पुन्हा आपल्या विहित जबाबदाऱ्यांकडे वळतात.**

# आंबेनळी घाटाचे नूतनीकरण करण्याची गरज

**खबरबात**
**शैलेश पालकर**



पोलादपूर ते महाबळेश्वर दरम्यान सुमारे ३२ कि.मी. अंतराचा फिटझगेराल्ड म्हणजेच सध्याचा सर्वश्रुत आंबेनळी घाट पोलादपूर तालुक्यातील कापडे खुर्द येथून सुरू झाला आहे.

पूर्वी शिवकाळात महाबळेश्वरपर्यंत अथवा त्याहीपुढे जाण्यासाठी महाडच्या अग्नेय दिशेने माझेरी, वरंध, शिवथरघळ, पिंपळवाडी असा २४ कि.मी.चे सह्याद्री पर्वतराजीतून मार्गाक्रमण करून पोलादपूर तालुक्यातील किनेश्वर गावाजवळ पार घाट सुरू होत असे. या मार्गाला आजही शिवाजी रस्ता म्हटले जाते. महाड तालुक्याला पोलादपूर पेटयाचा मुलूख १९४८ सालापर्यंत जोडला होता. सातारा, वाईशी कमी अंतरात पोहोचण्याचा हा मार्ग बिकट तर होताच पण या मार्गाची डागडुजी, देखभाल दुरूस्ती करण्यासाठी खुपच खर्च झाला. तरीही ब्रिटीशांना घोडागाडी अथवा मोटारगाडीसाठी उपयुक्त मार्ग तयार करण्याची आवश्यकता भासू लागल्याने पार घाटाच्या उत्तरेस ०.८१ कि.मी. अंतरावर कापडे खुर्द गावाजवळ नव्याने घट बांधला. या घाटाला फिटझगेराल्ड म्हणत. हाच सध्याचा आंबेनळी घाट होय. या घाटाच्या उभारणीस १८७१ साली सुरूवात होऊन केवळ ४ लक्ष ४४ हजार रूपये खर्च झाला. हा घाट पाचच वर्षात वाहतुकीस खुला होऊन १८७६ सालापासून ब्रिटीश आणि व्यापारी घोडयाला लगाम न लावता कापडे खुर्दपर्यंत उतरत असत. या घाट उभारणीच्या काळातच श्रीक्षेत्र महाबळेश्वरचा गिरिस्थान थंड हवेचे ठिकाण म्हणून ब्रिटीशांनी विकास केला.

आंबेनळी घाटातून पर्यटकांची तसेच सातारा, वाई, कराड, कोल्हापूरपर्यंत जाणाऱ्या प्रवाशांची वाहतूक आंबेनळी घाटात मोठया प्रमाणात होते. हा संपूर्ण घाटरस्ता दूर्गम आणि त्याभोवतीच्या दऱ्या खूपच खोल असूनही या घाटात डोंगराच्या बाजूने रस्त्यावर कोसळणारे मातीचे दरडीचे ढिगारे दोन तीन वर्षे हलविले गेल्याने घाटरस्ता कसाबसा दुपदरी म्हणावा इतका अरूंद झाला आहे. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला संरक्षक कठडे नसल्याने वाहने कोसळून अनेकांचे जीवन संपुष्टात आले आहे. परिणामी, महाबळेश्वरला मुंबईचे पर्यटक आता मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्गावरून व त्यानंतर पुणे ते वाईमार्गे पसरणी घाटातून जाऊ लागले.

मात्र, तो पसरणी घाट यापेक्षाही अधिक असुरक्षित असल्याचे गुजरात राज्यातील एक आरामगाडी उलटून अनेक कुटूंबे दगावल्याने स्पष्ट झाले. पोलादपूर ते महाबळेश्वर या मार्गावरही दरवर्षी अलिशान गाडयांचे अपघात झाले आहेत. त्यात प्रत्येकवेळी किमान पाच ते सात प्रवासी ठार झाले आहेत.अलिकडेच, येथे दापोली येथील डॉ.बाळासाहेब सावंत कृषी विद्यापिठाच्या बसला अपघात होऊन तब्बल ३० जण दगावले असल्याने भविष्यात तसा धोका निर्माण होणार नाही, यासाठी खबरदारी घ्यावी लागणार आहे.

पोलादपूर ते महाबळेश्वर दरम्यान सुमारे ३२ कि.मी. अंतराचा फिटझगेराल्ड म्हणजेच सध्याचा सर्वश्रुत आंबेनळी घाट हा राजकीय इच्छाशक्ती प्रबळ झाल्यास नजिकच्या काळात ऐतिहासिक व पर्यावरण पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याचे स्वप्न साकारण्याचे प्रयत्न युध्दपातळीवर सुरू होतील, अशी अपेक्षा आहे. पोलादपूर-वाई-सुरूर राज्यमार्ग या रस्त्यावरील संरक्षण भिंत व रूंदीकरण, मोऱ्यांचे बांधकाम, मोठया मोरीचे बांधकाम, अभियांत्रिकी दुरूस्ती, अभियांत्रिकी सुधारणा, संरक्षण भिंत बांधणे अशी प्रत्येकी २० लाख रूपये खर्चाची सहा कामे करण्याचा डिसेंबर २०१५ मध्ये शुभारंभ करण्यात आला. तत्पूर्वी, पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावरील चार ब्रिटीशकालीन पुलांच्या कामांचीही तरतूद करण्यात आली होती. सदर सहा कामांची एकूण अंदाजे खर्चाची मंजूरी १.२० कोटी रूपयांची असल्याची माहिती तत्कालीन डेप्युटी इंजिनियर जाधव यांनी दिली होती. या कामांतर्गत पोलादपूरच्या चोळई आणि सावित्री नदीच्या संगमावरील लेप्रसी हॉस्पिटलजवळील पूलासाठी ६० लाख, मोरगिरी फौजदारवाडी फाटयाजवळील पुलासाठी ३५ लाख, कापडे बुद्रुक भवानवाडीजवळील पुलासाठी २६ लाख आणि आड-पायटे-कापडे खुर्द येथील पुलासाठी ४५ लाख अशा चार ब्रिटीशकालीन पुलांचे काँक्रीटचे जॅकेट करण्यात आले आहे.

या सुमारे दीडशेहून अधिक वर्षे जुन्या ब्रिटीशकालीन दगडी पुलांच्या खांबांच्या बांधकामांना अर्ध्या उंचीपर्यंत सिमेंट काँक्रीटची बंदीस्ती करण्यात येऊन या जॅकेटधारी पुलांची रूंदीदेखील वाढविण्यात आली आहे, मात्र आता या पुलांप्रमाणेच आंबेनळी घाटातील रस्तादेखील धोकादायक स्थितीत आला असल्याने तसेच मंगळवारी पोलादपूर तालुक्यातील कालिकामंदिरासमोरील रस्त्यावर दरड कोसळल्यानंतर याठिकाणी रस्त्याला भेगा पडल्या आहेत. यामुळे आता हा आंबेनळी घाट रूंदीकरणासह नूतनी करण होण्याची गरज आहे.

# ...म्हणून साजरा होतो सांख्यिकी दिवस



थोर सांख्यिकी तज्ञ दिवंगत प्राध्यापक प्रशांत चन्द्र महालनोबिस यांच्या जयंती निमित्त हा दिवस साजरा केला जातो. सामाजिक आणि आर्थिक योजनांमध्ये तसेच देशाच्या विकासात आकडेवारीचे महत्त्व युवकांमध्ये जनजागृती व्हावी, हा या दिवसाचा उद्देश आहे.

विश्वविख्यात संख्या शास्त्रज्ञ स्व. प्रा. प्रशांतचंद्र महालनोबिस यांच्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांचा जन्मदिन २९ जून हा राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जिल्हा सांख्यिकी कार्यालयात सांख्यिकी दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) ज्ञा.व आंबेकर यांनी दीपप्रज्वलन करून अध्यक्षस्थान भूषवले.

प्रास्ताविक सांख्यिकी सहायक अमोल तोंडे यांनी केले. त्यांनी संख्याशास्त्राचे महत्व विषद केले. या वर्षीच्या राष्ट्रीय सांख्यिकी दिनाची मध्यवर्ती संकल्पना शाश्वत विकास ध्येयाकरीता सांख्यिकी अशी होती. या संकल्पनेवर आधारीत नवीन ध्येय-धोरणे ठरविण्यासाठी सांख्यिकीय माहितीची उपयुक्तता यावर संशोधन सहायक अनिल शेवाळे यांनी भर दिला.

जिल्हा नियोजन अधिकारी आंबेकर यांनी स्व. महालनोबिस यांचे संशोधनात्मक अधिष्ठानाबाबत माहिती दिली. सांख्यिकी दिन म्हणजे सांख्यिकीचे जन्मदात्यांचा दिवस असल्याचे प्रतिपादन केले. आभार प्रदर्शन संशोधन सहायक डी. पी पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा सांख्यिकी कार्यालयातील सांख्यिकी सहायक श्रीमती अ. म. तायडे, अ.रा. तोंडे, प्र.रा. बोदडे, उ.अ डाबेराव, अन्वेषक कि. भ. शिरसाट, लिपिक र.ना हातलकर, श्रीमती सु.सु पवार आदी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

२९ जून १८९३ रोजी जन्मलेले प्राध्यापक प्रशांत चंद्र महालनोबिस भारतीय सांख्यिकीचे जनक म्हणून ओळखले जातात. दोन डेटा सेटचा तुलनात्मक अभ्यास त्यांनी सुचविलेल्या उपायांना महालनोबिस अंतर (महालनोबिस डिस्टन्स) म्हणून ओळखले जातात. ते नियोजन आयोगाचे (१९५६-१९६१) दरम्यान सदस्य होते आणि त्यांनी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी दोन-क्षेत्रातील इनपुट-आउटपुट प्रारूप दिले जे नंतर नेहरू-महालनोबिस प्रारूप म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी डिसेंबर १९३१ मध्ये भारतीय सांख्यिकी संस्था (आयएसआय) ची स्थापना कोलकाता येथे केली. त्यांना पद्म विभूषण (१९६८), ऑक्सफर्ड विद्यापीठाकडून वेल्डन मेमोरियल पुरस्कार (१९४४) रॉयल सोसायटी, लंडनचे फेलो (१९४५) इत्यादी पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

**(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# भारतात स्मार्टफोनच्या किमती होणार कमी...

भारतात गेल्या अनेक वर्षांपासून स्मार्टफोनची निर्मिती होते. एवढेच नाही, तर मोठ्या प्रमाणावर स्मार्टफोन एक्सपोर्ट देखील केले जातात. मात्र, भारतात स्मार्टफोन तयार करताना काही अडचणीही येत होत्या. हे फोन तयार करण्यासाठी लागणारे पार्ट्स बाहेरून मागवावे लागत होते. परिणामी फोन तयार करण्यासाठी अधिक खर्च येत होता. मात्र आता भारताला एक मोठे यश मिळाले आहे. जे जाणून आपल्यालाही अभिमान वाटेल.



खरे तर, अमेरिकन कंपनी मायक्रॉन टेक्नॉलॉजी गुजरातमध्ये सेमीकंडक्टर बनविण्याचे युनिट टाकत आहे. यासंदर्भात बोलताना केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आयटी आणि टेलीकॉम मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, मायक्रॉन पुढील १८ महिन्यांत भारतामध्ये चिपचे प्रोडक्शन सुरू करेल. एखाद्या कंपनीने भारतात अशा प्रकारची चीप तयार करण्याची ही पहिलीच वेळ असेल. साधारणपणे डिसेंबर २०२४ मध्ये भारतात ही चीप तयार होण्याची शक्यता आहे.

माध्यमांतील वृत्तांनुसार, ही चीप भारतात तयार झाल्यानंतर, मोबाईल, लॅपटॉप, सर्व्हर आदी काही इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसेस तयार करण्यासाठी कमी खर्च येईल. यामुळे भारतात स्मार्टफोनची किंमत कमी होईल. याच बरोबर भारतातून जगातील इतर देशांत स्मार्टफोन एक्सपोर्ट करण्यात तेजी येईल. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेलाही मोठा फायदा होईल. याशिवाय देशात मोठ्या प्रमाणावर नोकऱ्याही निर्माण होऊ शकतात.

केंद्रीय मंत्र्यांच्या मते, या चिप युनिटसाठी ८२५ मिलियन डॉलरची गुंतवणूक अपेक्षित आहे. हे प्रोडक्शन युनिट ५,००,००० स्क्वेअर फुटांत पसरलेले असेल. जे २०२४ च्या अखेरीस सुरू होईल.एका वारकर्त्याने त्याच्या Pixel 7 Pro वर व्हॉट्सअॅपच्या मायक्रोफोन क्रियाकलापाचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. मेटा-मालकीच्या कंपनीने असेही सुचवले आहे की, बग प्रत्यक्षात Android च्या गोपनीयता डॅशबोर्डवर आहे जो चुकीची माहिती देत आहे. या संदर्भात व्हॉट्सअॅपने सांगितले की, त्यांनी गुगलला चौकशी करून समस्येचे निराकरण करण्यास सांगितले आहे. हा प्रोब्लेम आता सोडवण्यात आला आहे.

# आज आषाढी एकादशी

**निमित्त**



आषाढी एकादशी म्हणजे आषाढ महिन्यातील एकादशी तिथी. आषाढ महिन्यात किमान दोन एकादशी असतात, आषाढ शुद्ध एकादशी आणि आषाढी वद्य एकादशी अशा दोन एकादशी या महिन्यात असतात. आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला देवशयनी आषाढी एकादशी म्हणतात. हा दिवस धार्मिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचा मानण्यात येतो. या दिवशी देव निद्रिस्त होतात अशी समजूत आहे.

तिथीची वृद्धी झाली, किंवा अधिक मास असेल तर आणखीही एकादशी असू शकतात. देवशयनी एकादशी, स्मार्ताची एकादशी, भागवत एकादशी, अशा तिथी वृद्धी या चांद्रमास गणनेतील फरकामुळे होतात. अधिक मास आल्यास आधिक मासाच्या आणखी दोन एकादशी येतात. अधिक महिन्यात येणाऱ्या दोनही एकादश्यांना कमला एकादशी हेच एकमेव नाव असते.

पंढरपूरचा विठोबा हा अवघ्या महाराष्ट्राचे दैवत असून आषाढी एकदशीला इथे वारकऱ्यांचा मोठा मेळा भरतो. महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून ठिकठिकाणाहून लाखो भाविक लोक विठ्ठल नामाचा गजर करीत आषाढी एकाद्शीला पायी चालत येतात. हिलाच आषाढी वारी म्हणतात. विठ्ठलाचा नामघोष करत अनेक वारकरी पायी या ठिकाणी अगदी भक्तीभावे येऊन पोहचतात. चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेतात. आषाढीला या दिवशी पंढरपुरास शेगाव येथून पूर्णब्रह्म अधिकारी श्री संत गजानन महाराजांची आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूहून तुकारामांची, त्र्यंबकेश्वराहून निवृत्तीनाथांची, पैठणहून एकनाथांची, उत्तर भारतातून कबिराची पालखी येते. या दिवशी वारकरी संप्रदायात उपवास करण्याचे विशेष महत्त्व आहे. दर आषाढी एकदशीला वारकरी संप्रदाय वारी घेऊन पंढरपुरात येण्याची परंपरा आठशे वर्षांपेक्षाही अधिक काळापासून सुरू असल्याचे सांगण्यात येते.

आषाढी एकादशीच्या व्रतामध्ये सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते असा समज आहे. म्हणून सर्व व्रतांमध्ये आषाढी एकादशीच्या व्रताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पंढरपूरला अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा पुरावा मिळतो तसेच वैकुंठभूमीच्या आधीपासूनच पंढरपूर अस्तित्वात आले असा लोकांचा समज आहेत. म्हणूनच पृथ्वीवरील सर्वात पुरातन अशा तीर्थक्षेत्राचा पंढरपूर असा उल्लेख केला गेला आहे.

आषाढी एकादशीला व्रत- उपवास करण्याची पद्धत आहे. काही लोक निर्जळ तर काही उपवासाचे पदार्थ खाऊन व्रत ठेवतात. एकादशीच्या आदल्या दिवशी अर्थात दशमीच्या दिवशी एकभुक्त राहून एकादशीला पहाटे उठून स्नान करून तुळस वाहून विष्णूपूजन करावे. हा संपूर्ण दिवस उपवास करावा. रात्री हरिभजन करत जागरण करावे. विठ्ठल नामाचा जयघोष करत संपूर्ण दिवस देवाच्या नामस्मरणात घालवावा. आषाढ शुद्ध द्वादशीला वामनाची पूजा करून पारणे सोडावे. या दोन्ही दिवशी विष्णू देवाची पूजा करून अहोरात्र तुपाचा दिवा लावावा.

**(साभार : वेबदुनिया)**

**क्लिक...क्लिक...!**




**मुरुड : आषाढी एकादशीनिमित्त ओमकार बालवाडीच्या मुलांनी विठ्ठलाच्या नामाचा गजर करत दिंडी काढली. या छोट्या वारकऱ्यांची सुधीर नाझरे यांनी टिपलेली छबी.**

## आरोग्य प्रहर

# नाश्त्याला अजिबात खाऊ नयेत 'हे' पदार्थ

दिवसाची सुरुवात योग्य आहाराने करावा असा सल्ला तज्ज्ञ देतात. हेल्दी नाश्ता केल्यामुळे शरीराला ताकद मिळते. व दिवसभर काम करण्याचीही उर्जा मिळते. नाश्त्यासाठी अनेक ऑप्शन आहेत. पण कोणता पदार्थ नाश्त्यासाठी उत्तम आहे, व कोणता पदार्थ नाश्त्यामध्ये खाणे टाळावा. याची माहिती असणं गरजेचं आहे. जर चुकीच्या पदार्थाने दिवसाची सुरुवात केली तर, आरोग्यावर देखील दुष्परिणाम होऊ शकतात.



न्यूट्रिशनिस्ट प्रियांशी भटनागर यांच्या मते, ''दिवसभर काम करण्याची उर्जा मिळावी, यासाठी हेल्दी - पौष्टीक नाश्ता खा. प्रोटीनयुक्त व हेल्दी पदार्थ खाल्ल्याने दिवसभर काम करण्याची ताकद मिळते. व वारंवार भूकही लागत नाही.

**व्हाईट ब्रेड** - काही लोकं नाश्त्यामध्ये टोस्ट - बटर किंवा टोस्ट - चहा खातात. व्हाईट ब्रेडमध्ये रिफाइंड कार्बो हायड्रेट्स आढळते. ज्यामुळे पोट भरत नाही. व वारंवार भूक लागते. यात असलेल्या कार्ब्समुळे रक्तातील साखरेची पातळी देखील वाढू शकते. त्याऐवजी आपण गव्हाच्या पिठाचा ब्रेड खाऊ शकता.

**चहा - बिस्कीट** - बिस्किटांमध्ये सामान्यतः रिफाइंड साखर आणि कर्बोदकांचे प्रमाण जास्त असते. यासह अनहेल्दी सॅच्युरेडेट फॅट्स देखील असते. त्यात कोणतेही पोषक तत्वे आढळत नाही. रिकाम्या पोटी चहा - बिस्कीट खाणे टाळा. यामुळे सिडिटी यासह इतर समस्या निर्माण होऊ शकतात.

**पॅनकेक** - पॅनकेक्समध्ये फॅट्स, साखर आणि कॅलरीजचे प्रमाण जास्त असते. जे आरोग्यासाठी चांगले नाही. त्यामध्ये फायबर नसते, ज्यामुळे नाश्ता खाल्ल्यानंतर लगेच भूक लागते. यासह रक्तातील साखरेची पातळी देखील वाढू शकते. रिकाम्या पोटी याचे सेवन केल्याने अपचन होऊ शकते.

**पॅक फूड** - काही लोकं सकाळी दुधासोबत कॉर्नफ्लेक्स खातात. लहान मुलांनाही देतात, परंतु यामध्ये साखर आणि चरबीचे प्रमाण जास्त असते. व प्रोटीन कमी असते. आरोग्याला त्यातून कोणतेही पौष्टीक घटक मिळत नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# अतिवृष्टीमुळे विहीरीला तडे

## महाडच्या परडी रायगडवाडी येथील घटना

**महाड : प्रतिनिधी**



महाड तालुक्यातील किल्ले रायगडच्या पायथ्याशी असलेल्या रायगडवाडी या दुर्गम गावातील परडी येथील पिण्याच्या पाण्याच्या विहीरीचा काही भाग अतिवृष्टीमुळे कोसळला असून ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचे हाल झाले आहेत. या प्रकरणी भाजपचे बिपीन महामुणकर यांनी तात्काळ नवीन विहीर बांधुन देण्याची मागणी केली आहे.

महाड तालुक्यात गेल्या आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. तालुक्यात अजुन पर्यंत १९९ मिमी एवढा पाऊस पडला आहे. या पावसाने किल्ले रायगड येथे दरड कोसळल्याने बंद करण्यात आला आहे. तर तालुक्यात काही ठिकाणी छोट्या मोठ्या दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. याच अतिवृष्टी च्या पावसात सोमवारी परडी रायगडवाडी या गावाती पिण्याच्या पाण्याचे एकमेव स्त्रोत असणारी विहीरीला तडे गेले. यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून विहीर अजुन कोसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सध्या या गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या घटनेची दखल घेत भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर यांनी तात्काळ भेट देऊन विहीरीचा पंचनामा करून घेत तात्काळ या ठिकाणी नव्याने विहीर बांधुन देण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. या वेळी तालुका सरचिटणीस महेश शिंदे, उपाध्यक्ष चंद्रजित पालांडे, विभाग अध्यक्ष अजित अवकीरकर, सागर हिरवे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# महामार्गावर सिलिंडरचा ट्रक उलटला

**खोपोली : प्रतिनिधी**

जुना मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्गावर लोधिवली गाव येथे बुधवारी गॅस सिलिंडर वाहतूक करणारा ट्रक उलटल्याची घटना घडली. सुदैवाने सिलिंडर रिकामी असल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

सिलेंडरच्या रिकाम्या टाक्या पनवेलच्या दिशेने घेऊन जाताना वळणावर ट्रकचालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे ट्रक रस्त्याच्या बाजूला जाऊन उलटला. या अपघातात ट्रकचालक आणि क्लिनर किरकोळ जखमी झाले. सिलिंडर टाक्या कराडे (पनवेल) येथील एचपी गॅस कंपनी भरण्यासाठी घेऊन जात असल्याची माहिती मिळाली आहे.

# महादेववाडी शाळेत आषाढीनिमित्त दिंडी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील राजिप शाळा महादेववाडी येथे बुधवारी (दि. २८) आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक व शाळा कमिटी यांनी पारंपरिक पोशाख परिधान करून पांडुरंगाचा जयघोष केला. सर्व बालकलाकार गायन, फुगड्या, गोल रिंगण याचा सर्वांनी आनंद घेतला.



## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२–२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र/प.महा/पर्या./३९२३/प्र.क्र. ०४/८७/२०२३ दिनांक:२६/०६/२०२३

### जाहीर नोटीस

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये पर्यावरण पूरक गणपती उत्सवा करीता जिंगल / song मोहीम राबविण्यासाठी ऐजन्सी नेमणूक करणेकामी तातडीने इच्छुक पुरवठा धारक / व्यक्ती यांचेकडून जाहीर निविदा मागवित आहेत.

संबंधितानी त्यांची सिलबंद निविदा महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात दिनांक १०/०७/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर तारखेनंतर आलेली निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | कामपुर्णत्वाचा कालावधी | अनामत रक्कम | निविदा प्रपत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| | पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये पर्यावरण पूरक गणपती उत्सवा करीता जिंगल / song मोहीम राबविण्यासाठी ऐजन्सी नेमणूक करणेबाबत. | रु.६,६१,०००/– | कार्यादेश दिल्यापासून काम पूर्ण होईपर्यंत | रु.६६१०/– | रु.५९०/– (GST सह) |

निविदाच्या अटी व शर्ती आणि इतर माहीती पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागास पाहावयास मिळतील.

**सही/–**
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

# नागोठणे हायवेनाका बलात्कार प्रकरणातील आरोपी अटकेत

**नागोठणे : प्रतिनिधी**

मुंबई – गोवा महामार्गावरील नागोठण्यातील हायवेनाका या गजबजलेल्या परिसरात नागोठण्यातीलच मिरा नगर भागातील २७ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार करण्यात आले आहेत. याप्रकरणी मिरानगर येथीललच आरोपी शाहिद पठाण (वय २५) याला नागोठणे पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी नागोठणे पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत ७ एप्रिल २०२३ रोजी हायवेनाका येथे आरोपी शाहिद पठाण याचे गॅरेजचे पाठीमागील बाजूस नागोठण्यातील मिरा नगर येथील २७ वर्षीय फिर्यादी तरुणीची मैत्रीण हिला मला काम मिळेल का असे विचारले असता फिर्यादी तरुणीने शाहिद पठाण, (वय २५, रा. मिरानगर पोस्ट, नागोठणे ता.रोहा) याचे नागोठणे येथील मुंबई गोवा हायवे लगत असणारे गॅरेज जवळ घेवुन गेली. गॅरेजमध्ये काम करणाऱ्या शाहिद पठाणबरोबर ओळख करून देवुन फिर्यादीची मैत्रीण तेथुन कामानिमित्त बाहेर निघुन गेली असता फिर्यादीस आरोपी गॅरेजचे पाठीमागे बसण्यास सांगुन तिचे अंगाशी झटायला लागला. त्याने खांद्यावर हात ठेवु लागला व तिला धक्का दिला व तिचे कानाखाली मारली व बोलला की, आरडा ओरडा केलास तर ठार मारेन असे बोलुन तिचेवर जबरदस्तीने शरीरसंबंध केले व तिचा वारंवार पाठलाग करून तुझे फोटो वायरल करेन अशी धमकी दिली.

याबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात बलात्कारासह विविध कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार मिरानगर येथीलच आरोपी शाहिद पठाण याला नागोठणे पोलिसांनी अटक केली.

## Public Notice

Date: 28.06.2023.

WE, Shikara Constructions Pvt. Ltd, Address: 204, Bezzola Complex, Opp. Suman Nagar, Sion Trombay Road, Chembur, Mumbai- 400071, hereby give following public notice for information.

We are name/title owners and rightful possessors of the below mentioned Non Agricultural Land at Village Mouje NEREPADA, Taluka-Panvel, District-Raigad. It is duely registered in the records of the revenue Department. Its description is as per following tables :

| Serial No. | Survey/ Gat No. | Area in Square Meters. |
|---|---|---|
| 1 | 55/0 | 4020 |

The Competent Authority (C.A.) i. e. The Associated Planner (NAINA) CIDCO, has duly granted us permission to construct a building in the abovementioned land vide his Letter No. CIDCO/NAINA/NEREPADA/BP-545/CC/2022/0201, Dated 27/04/2022 AND The Competent Town Planner (Nagar Rachana Niyojan Adhikari) i.e. Associated Planer (NAINA), CIDCO has issued us a Commencement Certificate vide his Letter No CIDCO/NAINA/NEREPADA/BP-545/CC/2022/0201, Dated 27/04/2022. Accordingly, we are hereby publishing following description of our construction project on the abovementioned land for the information of general public.

| | |
|---|---|
| Name & Address of the Owner & Developers | Shikara Constructions Pvt. Ltd, Address: 204, Bezzola Complex, Opp. Suman Nagar, Sion Trombay Road, Chembur, Mumbai-400071 |
| Name of the Contractor & Description of Property | Vrunda Construction, Add: 504, Shree Sankalp CHS, Plot no- A10, Sector- 8, Ulwe, Navi Mumbai 410206 |
| The Order No. & Date of the Grant of Permission Letter | CIDCO/NAINA/NEREPADA/BP-545/CC/2022/0201, Dated 27/04/2022 |
| The Order No. & Date of the Commencement Certificate | CIDCO/NAINA/NEREPADA/BP-545/CC/2022/0201, Dated 27/04/2022 |
| Approved Floor Space Index (FSI) | Approved FSI: 1 (One) |
| Total Number of Flats and their Total Approved Area | The permission has been granted to construction total 51 flats and 11 Shops to be constructed in (1) plus Six (6) Floor Building whose total construction area is 4020 square Meters. |
| Address of the place where approved Maps & Documents are available for verification | Shikara Constructions Pvt. Ltd, Address: 204, Bezzola Complex, Opp. Suman Nagar, Sion Trombay Road, Chembur, Mumbai-400071 |
| Name of the Architect | Messrs. Swapnil Kalyankar Architects Mr. Swapnil Kalyankar |
| Name of the Structural Engineer | Messrs. Prapti Associates. Mr. Ram Marathe |

**Shikara Constructions Pvt. Ltd**
Address: 204, Bezzola Complex, Opp. Suman Nagar, Sion Trombay Road, Chembur, Mumbai-400071

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमीनमालक १. श्री. धनाजी दामोदर पाटील, २. श्री. डाळुराम दामोदर पाटील, ३. श्री. कमळाकर दामोदर पाटील, ४. श्री. सुंदर दामोदर पाटील, ५. सौ. अनिता कांचन पाटील, ६. श्रीमती. पार्वती महादेव पाटील, ७. सौ. मेघना किशोर शेळके, आणि ८. श्री. शैलेश महादेव पाटील यांच्या मालकी हक्क, ताबे कब्जा व वहीवाटीतील मौजे जांभूळपाडा, ता. उरण, जि. रायगड येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे –

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट क्र. व उपविभाग क्र. | लागवडी योग्य क्षेत्र हे. आर. प्रति. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| जांभुळपाडा | ३०/११ | ०–१३–९० | १.६२ |
| | ३०/८ | ०–०३–५० | ०.५९ |
| | ३०/५ | ०–०८–८० | ०.७५ |
| | ३०/४ | ०–२६–३० | ५.८७ |
| एकूण क्षेत्र | | ०–५२–५० | |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील साठेकरार / खरेदीखत हे आमचे अशिल आणि मुळ जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, भेट अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचाही हक्क, हितसंबंध, दावा असेल तर त्यांच्या पृष्टयार्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदरहू जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**धनंदा प्रदिप मोकल**
**(वकील उच्च न्यायालय) पत्ता शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे फोन नं.९६१९५०५९५८**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमीनमालक १. सौ. रेखा प्रभाकर पुरव, २. सौ. रिना प्रभाकर पुरव, ३. सौ. राखी प्रभाकर पुरव, ४. सौ. मधुमती वसंत दर्णे, ५. श्री. उल्हास अनंत म्हात्रे, ६. श्री. संदिप अनंत म्हात्रे, ७. श्री. मनोज अनंत म्हात्रे, ८. श्री. संतोष अनंत म्हात्रे, ९. श्री. संजय अनंत म्हात्रे, १०. सौ. सुप्रिया सुदीप म्हात्रे, ११ श्री. स्वप्निल सुदिप म्हात्रे, १२. सौ. प्रियांका सुदिप म्हात्रे, १३. सौ. अर्चना संतोष राउत, १४. सौ. अर्चेस अरुण पुरव, १५. अजिता अरुण पुरव, आणि १६. शितल अरुण पुरव यांच्या मालकी हक्क, ताबे कब्जा व वहीवाटीतील मौजे रानवड, ता. उरण, जि. रायगड येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट क्र. व उपविभाग क्र. | लागवडी योग्य क्षेत्र हे. आर. प्रति. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| रानवड | ४३/१ | ०–४०–०० <br> पो. ख. ०–०१–८० | ९.६२ |
| | | ०–४१–८० | |
| पैकी विक्रीयोग्य क्षेत्र | | ०–१८–१० | |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि मुळ जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापूर्वी सदरची मिळकत से निर्वेध, बिनकर्जी बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट भेट अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचाही हक्क, हितसंबंध दावा असेल तर त्यांच्या पृष्टयार्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरूप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदरहू जमिन मिळकत ही कायमस्वरूपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**धनंदा प्रदिप मोकल**
**(वकील उच्च न्यायालय) पत्ता शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे फोन नं.९६१९५०५९५८**

## जाहीर नोटीस

शिकारा कंन्स्ट्रक्शनस् प्रा. लि. पत्ता: २०४, बेझोला कॉम्पलेक्स, सुमन नगरच्या समोर, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबुर, मुंबई ४०००७१ तमाम जनतेच्या माहितीसाठी खालीलप्रमाणे जाहीर सुचना देत आहोत.

आमचे नांवे, ताबे– कब्जातील मौजे– नेरेपाडा, ता. पनवेल, जि. रायगड येथे महसूल अभिलेखामध्ये वर्णन केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमुद केल्याप्रमाणे बिनशेती जमीन मिळकत आहे.

| अ.क्र. | सर्व्हे नं./ गट. नं. | क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|
| १ | ५५/० | ४०२० |

सक्षम अधिकारी म्हणजेच असोसिएट प्लानर (नैना) सिडको ने आम्हास वर नमुद जमीन मिळकतीमध्ये इमारती बांधण्यास पत्र क्र. सिडको/नैना/पनेवल/नेरेपाडा/बीपी–५४५/सीसी./२०२२/०२०१, दि. २७/०४/२०२२ व्दारे परवानगी दिलेली आहे. आणि सदर सक्षम नगररचना नियोजन अधिकारी म्हणजेच असोसिएट प्लानर (नैना) सिडको यांनी त्यांचे पत्र क्र. सिडको/नैना/पनेवल/नेरेपाडा/बीपी–५४५/सीसी. / २०२२/०२०१, दि. २७/०४/२०२२ व्दारे कमेन्समेंट सर्टिफिकेट दिलेले आहे. त्या अनुषंगाने आम्ही आमच्या प्रकल्पासंबंधीत खालीलप्रमाणे माहिती जनतेच्या माहितीसाठी प्रकाशीत करत आहोत.

| | |
|---|---|
| मालक/ विकासकांचे नाव आणि पत्ता | शिकारा कंन्स्ट्रक्शनस् प्रा. लि. पत्ता: २०४, बेझोला कॉम्पलेक्स, सुमन नगरच्या समोर, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबुर, मुंबई ४०००७१ |
| कंत्राटदाराचे नाव आणि मिळकतीचे वर्णन | वृंदा कन्स्ट्रक्शन, ५०४, श्री संकल्प को. ऑ. हौ. सो, प्लॉट नं. ए १०, सेक्टर–८. उलवे, नवी मुंबई ४१०२०६ |
| विकसनाची परवागनी मंजुर झालल्याचे आदेश क्र. आणि दि. | सिडको/नैना/पनेवल/नेरेपाडा / बीपी–५४५/ सीसी / २०२२/०२०१, दि. २७/०४/२०२२ |
| कमेन्समेंट सर्टिफिकेट आदेश क्र. आणि दि. | सिडको/नैना/पनेवल/नेरेपाडा / बीपी–५४५/ सीसी / २०२२/०२०१, दि. २७/०४/२०२२ |
| मंजुर फ्लोअर स्पेस इंडेक्स (एस.ए. आय) | मंजूर एफ.एस.आय १ (एक) |
| एकूण सदनिका आणि त्यांचे एकूण मंजुर क्षेत्र | ५१ सदनिका व ११ गाळे ज्या एका सटील अधिक ६ मजल्याच्या मंजुर क्षेत्र इमारतीमध्ये बांधण्याची परवानगी मिळालेली आहे ज्याचा संपूर्ण बांधीव क्षे. ४०२० मीटर आहे. |
| मंजुर नकाशे आणि इतर संबंधीत कागदपत्रांच्या प्रती तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या जागेचा पत्ता | शिकारा कंन्स्ट्रक्शनस् प्रा. लि. पत्ता: २०४, बेझोला कॉम्पलेक्स, सुमन नगरच्या समोर, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबुर, मुंबई ४०००७१ |
| आर्किटेक्टचे नाव | मे. स्वप्निल कल्याणकर आर्किटेक्टस् श्री. स्वप्निल कल्याणकर |
| स्ट्रक्चलर इंजिनीअरचे नांव | मे. प्राप्ती असोशिएटस् श्री. राम मराठे |

दिनांक : २८/०६/२०२३

**सही /–**
**शिकारा कंन्स्ट्रक्शनस् प्रा. लि.**
पत्ता : २०४, बेझोला कॉम्पलेक्स, सुमन नगरच्या समोर, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबुर, मुंबई ४०००७१

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय**
रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,
सार्वजनिक बांधकाम आवार– पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन – 402107

Email : elraigad.ee@mahapwd.gov.in/ elraigad.ee@gmail.com दुरध्वनी क्र. 02143-299288
Website : www.mahapwd.gov.in

**जा क्र. का.अ./राविवि/निविदा –1/1968/सन 2023** दिनांक : 26.06.2023

फेर ई–निविदा सुचना क्र. ०6 सन 2023-24

संदर्भ : 1. महाराष्ट्र शासन सा. बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी 2017/प्र.क्र.8/इमारती–2 दिनांक 27 सप्टेंबर 2018

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर– पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड** – 402107 **दुरध्वनी क्र.** 02143-299288 हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब– 1 नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई – निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर– पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड –** 402107 **दुरध्वनी क्र.** 02143-299288 यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | ई–निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक / ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम / कोरा निविदा शुल्क | ई–निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| ०1 | **Est.No.PESD/OW/103/2022-23** Providing Internal & External E.I., Water Pump, Telephone & Lan wiring, CCTV & Fire alarm system for Administrative Building at Karjat, Tal-Karjat, Dist-Raigad. | रू. 85,63,289/- | दिनांक 03.07.2023 सकाळी 11.00 वाजेपासुन दिनांक 10.07.2023 सायंकाळी 18.00 वाजेपर्यंत | 1 ) Prime Contractor should have Valid Electrical Contractor License issued by Govt. of Maharashtra. 2) Prime Contractor/ MOU Partner should have valid license of Fire Detection System **(Detection-Smoke detection, Hit detection, UV, Beam detector,manual call point and fire suppression system)** issued by Director of Maharashtra fire services Mumbai ठेकेदारांचा वर्ग अ व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. लिफाफा क्र. 1 मध्ये सदर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. इसारा रक्कम रु.86000/– निविदा शुल्क रु. 1000/– अधीक 18% वस्तु व सेवा कर रु. 180/– एकुण रु.1180/- | दिनांक 12.07.2023 |

खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
2. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा. बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर–पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड–402107 दुरध्वनी क्र. 02143-299288 या कार्यालयातील सुचना फलक
3. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पुर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र. 1 मध्ये जोडण्यात यावे.
4. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

**सही/–**
**(सं.ध. कट्टी)**
**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग,**
**सा.बां.पेण–रायगड**

विमाका/कोवि/२०२३–२०२४/८७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस / जनतेस या जाहीर नोटीस ने कळविण्यात येत आहे की, मौजे चिखले, ता.पनवेल, जि. रायगड येथील **हरी नामा चोरघा** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, कु. का. कलम प्रमाणे ४३ नियंत्रित सत्ता प्रकारची खालील वर्णनाची शेत जमिन मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमीनीचे वर्णन**
**मौजे – चिखले, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड.**

| कब्जेदारांची नावे | सर्व्हे नं/ गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| हरी नामा चोरघा | ५१ | २/ब/३/अ | ०–१३–२० | २.८४ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/ जनतेनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :– २८/०६/२०२३

**सही/–**
**श्री. अमोल शंकर साखरे**
**शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो.: ८६५२२३३७७१/९३२४३७२१६६**

## सिडकोसोबत आमदार मंदा म्हात्रेंची बैठक

# नवी मुंबईतील विविध समस्यांचा आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या उपस्थितीत सिडकोचे नवनियुक्त व्यवस्थापकीय संचालक अनिल दिग्गीकर यांच्या दालनात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजच्या प्रकल्प, नवी मुंबईतील विविध समस्याबद्दल बैठक झाली. बेलापूर येथे होत असलेल्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज याला ३.५ व्यावसायिक एफएसआय मिळणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी या वेळी सांगितले.




आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजचा पूर्ण प्रोजेक्ट प्लान तयार असून सदर प्रकल्प हा ८.४० एकरामध्ये उभारला जाणार असून अंदाजे ८१९.३० कोटी खर्च येणार आहे. जर भूखंड हस्तांतरणानंतर महापालिकेला ३.५ COMMERCIAL FSI हा जर हस्तांतरित केला तर येणाऱ्या व्यावसायिकच्या उत्पन्नातून सदर हॉस्पिटलचा खर्च चालेल यावर व्यवस्थापकीय संचालक अनिल दिग्गीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना हे काम लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आदेश दिले.

तसेच त्यापुढे म्हणाल्या की, गेली सतत दोन वर्षे पाठपुरावा करीत असलेले बेलापूर गावातील जो मोकळा भूखंड आहे त्याचा वापर हा गोडाऊन म्हणून वापर केला जातो तो भूखंड हा खेळाचे मैदान म्हणून सिडकोने घोषित करावे व सदरचा भूखंड हा नवी मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरित करून लवकरात लवकर मैदान तरुण वर्गासाठी खुले करावे. तसेच ग्रोमा असोशियनच्या मार्केट २ (धान्य बाजार) मधील व्यापारांच्या अडचणी, एनआरआय वसाहतीतील क्लब हाउस व इतर समस्या, जुईनगर येथील गणपती मंदिराच्या भूखंडा संदर्भात व सानपाडा येथील सेक्टर – २४ मधील भूखंड क्र. डी–६३ या भूखंडाचे सन २००४ च्या बाजारभावाप्रमाणे देण्यात यावे अश्या विविध समस्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सिडकोचे नवनियुक्त व्यवस्थापकीय संचालक अनिल दिग्गीकर यांच्या समोर मांडल्या. यावर त्यांनी सकारत्मक प्रतिसाद देत सदर प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आदेश सबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी महापौर जयवंत सुतार, माजी नगरसेवक सोमनाथ वास्कर, ॲड. सुहास वेखंडे, चेअरमन रंजन घोसाल, दीपक येवले, नवी मुंबई महापालिका उपायुक्त नितीन नार्वेकर, सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे व इतर सबंधित अधिकारी उपस्थित होते.

# मुसळधार पावसात मदतकार्य पथकांची तत्पर कार्यवाही

**नवी मुंबई : बातमीदार**

यावर्षी मान्सूनने बरीच वाट बघायला लावल्यानंतर अखेरीस शनिवारी (दि. २४) मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टीला सुरुवात झाली. नवी मुंबई आपत्ती व्यवस्थापनाने गरजेच्या ठिकाणी तत्काळ मदतकार्य पुरविले.



या अनुषंगाने शनिवारी सकाळी पर्जन्यवृष्टी होऊन मोठ्या प्रमाणात ३० झाडे पडूनही नवी मुंबई महापालिकेच्या मदतकार्य पथकांनी घटनास्थळी वर्दी मिळाल्यानंतर तत्परतेने पोहचत जनजीवन विस्कळीत होऊ दिले नाही. २४ व २५ जून रोजी बेलापूर विभागात सर्वाधिक पर्जन्यवृष्टी झाली. त्यामध्ये सेक्टर ४, ५ हा भाग सखल असल्यामुळे सीबीडी बेलापूर बसडेपोच्या परिसरात पर्जन्यवृष्टीची वेळ भरतीची असल्याने काही काळ पाणी साचून राहिले होते. महापालिकेच्या मदतकार्य पथकांनी त्याठिकाणी पाणी उपसा पंप लावण्याची कार्यवाही केली.

महापालिका आयुक्त नार्वेकर हे स्वत: नियंत्रक अधिकाऱ्यांशी संपर्कात राहून परिस्थितीवर लक्ष ठेऊन होते. तसेच पावसाळा कालावधी करीता नेमणूक केलेले नोडल अधिकारी व नियंत्रक अधिकारी आणि विभाग अधिकारी व अग्निशमन दल परिस्थिती गंभीर होऊ नये यादृष्टीने तत्पर मदतकार्य करण्यासाठी दक्ष होते. या काळात आगीच्या दोन घटना घडल्या. त्याचप्रमाणे रविवारी २५ जून रोजी सेक्टर १६ कोपरखैरणे येथे घराचा सज्ञा पडण्याची घटना घडली. या घटनेत सज्ञा दुचाकीवर पडल्याने कोणीही जखमी झालेले नाही.

झाडे पडल्याची वर्दी मिळाल्यानंतर अग्निशमन विभागाचे पथक व विभाग कार्यालयातील मदतकार्य पथके घटनास्थळी पोहचून आवश्यकतेनुसार झाडांची छाटणी किंवा कापणी करून वाहतुकीला व रहदारीला कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही अशाप्रकारे कार्यवाही करण्यात दक्ष राहिले.

## निवडक




### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नवी मुंबई :** छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिम्मित नेरूळ एमआयडीसी येथील महात्मा गांधी नगर येथे वंचित बहुजन युवा आघाडी, नवयुग सामर्थ्य युती संस्थान, व महामानव साहित्य प्रसारक फाउंडेशन यांच्या संयुक्त विध्यमाने इयत्ता दहावी – बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून व शालेय साहित्य भेट देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सामाजिक कार्यकर्त्या ॲड. स्वाती फडतरे, ॲड. जानकी आनंद, घरहक्क संघर्ष समितीचे हिरामण पगार, सुरेश वाघमारे, दीपक गायकवाड, राजेश भालेराव, विजय मोहिते, संजय वाघ, सचिन जोगदंड, संदीप माने, कैलास सरकटे, कल्याणराव हाणवते यांनी छत्रपती शाहु महाराजांच्या कार्यकाळा बाबत थोडक्यात माहिती देऊन अभिवादन केले.

### नवी मुंबईत बुद्धिजीवी संमेलन

**नवी मुंबई :** बुद्धिजीवी व प्रबुद्ध महिलांचे संमेलन नवी मुंबईत पार पडले. मोठ्या संख्येने उपस्थित कार्यकर्ते व बुद्धिजीवी उपस्थित होते. ह्या वेळेस महाराष्ट्र प्रदेश बुद्धिजीवी च्या सहसंयोजिका जयश्री चित्रे यांनी आणीबाणी बद्दल व त्या काळातली माहिती दिली. तसेच पंतप्रधान मोदींजींच्या ९ वर्षांच्या कारकीर्दीचा आढावा घेतला. जिल्हा अध्यक्ष रामचंद्र घरत ह्यांनी मोदींच्या चांगल्या कामात सर्वांनी मदत करावी, असे सांगितले. ह्या कार्यक्रमाला बेलापूर विधानसभा प्रमुख निलेश म्हात्रे, महामंत्री कृष्णा पाटील, नव्या मुंबईच्या महिला अध्यक्ष दुर्गा डोख, बुद्धिजीवी संयोजिका जयश्री कुमार, सर्वं प्रकोष्ठ अध्यक्ष राजेश राय, मंडळ अध्यक्ष अशोक चतटर्जी, महिला महामंत्री उपस्थित होते.



# आषाढी एकादशीनिमित्त आज दिंडी सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडावासियांना दिंडीचा, वारीचा, पालखीचा अनुभव घेता यावा आणि पंढरीला जाण्याचा योग आला नाही तरी आपल्याच विभागात दिंडीरूपी विठ्ठल नामाचा जयघोष करत येथेच पंढरीसम वातावरण निर्माण व्हावे यासाठी साईभक्त सेवा मंडळ आणि साईभक्त महिला फांऊडेशनच्या वतीने गुरुवारी (दि. २८)आषाढी एकादशी सानपाडा दिंडी सोहळा–२०२३चे आयोजन करण्यात आले आहे.

साईभक्त महिला फांऊडेशनच्या अध्यक्षा सौ. शारदा पांडुरंग आमले आणि समाजसेवक पांडुरंग आमले तसेच विभागातील साई भक्तांकडून आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सहकार्यातून या सानपाडा दिंडी सोहळ्याचे दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी १ दरम्यान हा दिंडी सोहळा काढण्यात येणार असून सानपाडा सेक्टर दोनमधील शिवमंदिरापासून या दिंडीस सुरूवात होणार आहे.

कामामुळे अथवा अन्य अडचणींमुळे प्रत्येकालाच आषाढी एकादशीला विठू माऊलींचे दर्शन घेणे शक्य होत नाही. त्यामुळे सानपाडावासियांना आपल्याच विभागात विठू माऊलींच्या पालखीत सहभागी होत यावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या दिंडी सोहळ्यात सानपाडावासियांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग आमले यांनी केले आहे.

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये भित्तिपत्रक स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. २८) अकाउंट व फायनान्स विभागातर्फे भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धे साठी महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला.




या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राध्यापक डॉ. अविनाश जुमारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या स्पर्धेमध्ये पूजा यादव व प्रगती मिश्रा (एस वाय आय टी ) यांनी प्रथम क्रमांक पटकाविला व द्वितीय क्रमांक विमला चौधरी व मेहक खान (एस वाय आय टी) यांनी पटकाविला तसेच तृतीय क्रमांक दामिनी कदम टी वाय बी एम एस हिने पटकाविला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले व क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा (विभाग प्रमुख अकाउंट व फायनान्स विभाग) यांनी केले तसेच प्रा. योगिता पाटील व प्रा. तनुजा सुमन यांनी सहकार्य केले.

# कुकशेत, सारसोळे विभागातील शाळांचे प्रश्न अखेर मार्गी

## भाजपचे सुरज पाटील यांचा आंदोलनाला यश

**नवी मुंबई : बातमीदार**

कुकशेत गावातील शाळेत तीन आठवड्यात शिक्षकांची पूर्तता केली जाईल तसेच सरसोळे विभागात सी बी एस ई शाळा सुरू करण्याविषयी तातडीने आयुक्तांशी चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन भाजपचे स्थानिक माजी नगरसेवक सूरज पाटील यांना दिल्याने ठिय्या आंदोलन स्थगित करण्यात आले.

कुकशेत गावातील शाळेत गेली अनेक वर्ष शिक्षकांची कमतरता आहे. याबाबत सातत्याने भाजपचे स्थानिक माजी नगरसेवक सूरज पाटील हे पालिकेकडे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी शिक्षक पुरवण्याची मागणी करत आहेत, मात्र पालिका प्रशासन त्यास दाद देत नसल्याने अखेर सूरज पाटील यांनी पालकांना घेत शिक्षण उपायुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले. शिक्षण उपायुक्तांनी ही बाब गांभीर्याने घेत सूरज पाटील यांचे म्हणणे ऐकून घेतले.



सर्व सामान्य घरातील पालकांना आपल्या मुलालाही इंग्रजी माध्यमाचे उच्च दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे असे स्वप्न उराशी बाळगून २०१३ साली बेलापुर विधानसभेची पहिली इंग्रजी माध्यमाची शाळा सुरज पाटील यांनी कुकशेत गाव येथे मंजूर करून आणली. आज अनेक विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मोफत मिळत आहे. अश्यातच कोरोना काळात अनेक खाजगी शाळांनी फी भरण्याचा तगादा लावला होता, परंतु अनेकांची आर्थिक परिस्तिथी नाजूक असल्यानाने अनेक पालकांना थकीत फी भरता आली नव्हती अशा खाजगी शाळांनी विध्यार्थ्यांना दाखलेही देण्यास नकार दिला होता,अश्या मुलांसाठी कुकशेत येथील पालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने या विद्यार्थ्यांना आधार दिला होता. मात्र शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांना शिकण्यात अडचणी येत होत्या. याबाबत पाटील सातत्याने पालिकेकडे पाठपुरावा करत होते, मात्र पालिका अधिकाऱ्यांना गांभीर्य नसल्याचे लक्षात येताच सूरज पाटील यांनी शिक्षण उपायुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले. प्रशासनाचा जोपर्यंत लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत आम्ही दालन सोडणार नाही, अशी भूमिका सुरज पाटील व सर्व पालकांनी घेतली. अखेर प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

> **शिक्षक कमतरतेमुळे आम्हाला पालकांसह आंदोलन करावे लागले. शिक्षण उपायुक्तांनी तीन आठवड्यात इंग्रजी माध्यमात शिक्षकांची पूर्तता करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. तसेच सरसोळे विभागातील पालिका शाळेत सीबीएसई शाळा सुरू करण्याविषयी तातडीने आयुक्तांशी चर्चा केली जाईल, असे कळवल्याने हे आंदोलन स्थगित केले आहे. मात्र जात आश्वासनांची पूर्तता झाली नाही तर मात्र पालिकेला घेराव घातला जाईल.**
> **–सूरज पाटील, माजी नगरसेवक, कुकशेत गाव, नेरूळ विभाग**

# विवेकानंद संकुलामध्ये पर्यावरण दिंडी

## आषाढी एकादशीनिमित्त कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील स्वामी विवेकानंद संकुल सानपाडा येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने विवेकानंद संकुलाच्या वतीने पर्यावरण दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या दिंडीमध्ये विवेकानंद संकुलातील प्राथमिक, पूर्व प्राथमिक आणि माध्यमिक इंग्रजी व मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थी विठ्ठल रुक्मिणीच्या वेशात आले होते. शाळेत रीतसर विधिवत त्यांचे पूजन करण्यात आले. वृक्षप्रेमी आबा रणावरे यांनी श्रीफळ वाढवून दिंडीचे प्रस्थान करण्यात आले.

दिंडीमध्ये ढोल, लेझीम टाळ मृदंग अशा अनेक वाद्यांचा समावेश होता. छोटे वारकरी त्याचप्रमाणे पालक विद्यार्थी या सर्वांनी दिंडीमध्ये उत्साहाने सहभाग घेतला होता.

रिमझिम पावसाच्या रिपरिपीमध्ये विद्यार्थी ओलेचिंब होऊन भिजत दिंडीमध्ये अत्यंत उत्साहाने सहभागी झाले होते. त्याचबरोबर सर्व शिक्षक वर्ग ही सहभागी झाला. सानपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद शंकर भोसले दिंडीचे दर्शन घेतले आणि शाळेने केलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.



# नेरूळमध्ये रिक्षाचालकांना मोफत पडदे वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

विजय नाहटा फाऊंडेशन व शिव वाहतूकसेनेतर्फे रिक्षाचालकांना रिक्षासाठी मोफत पडद्यांचे वाटप करण्यात आले. दिलिप आमले अध्यक्ष शिववाहतूक सेवा नवी मुंबई यांच्या माध्यमातून शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नेरूळ येथे हा कार्यक्रम राबविण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमहापौर अशोक गावडे, नेरूळचे पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस निरिक्षक ढामणकर, माजी नगरसेविका ॲड. सपना गावडे, संगीता आमले राज नायर, संगीता दाते, कलावती गर्जे, रिया गजरे उपस्थित होते. रिक्षाचालकांना रस्ता सुरक्षा विषयक नियमांचे पालन करण्याचे तसेच व्यसन न करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

रिक्षा चालक हे दिवसभर सार्वजनिक स्थळी वावरत असतात. त्यांनी आजूबाजूच्या घटना घडत असतात त्याबाबत दक्ष असावे. अनैतिक, अनुचित प्रकार घडत असल्यास पोलिसांना कळविण्याची सतर्कता बाळगावी, असे आवाहनदेखील या वेळी करण्यात आले.

# खारघर येथे शाहू महाराजांची जयंती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

प्रत्येक नागरिकांना समान न्याय मिळावा यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणारे व आरक्षणाचे प्रथम पुरस्कर्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची १४९ वी जयंती खारघर येथे साजरी करण्यात आली.

सेक्टर १२ येथील प्रणाम हॉटेल च्या मागील चौकातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या फलकाला पुष्पहार घालून अभिवादन करून करण्यात आले.

या वेळी शिव छावा सामाजिक संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष कृष्णा मर्ढेकर यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जीवनपट उपस्थित नागरिकांना कथन केला. खारघर भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस दीपक शिंदे यांनी विचार मांडताना शाहू महाराजांचे सामाजिक कार्य हे महिला, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, दलित अश्या सर्वांसाठी कसे दिशादर्शक होते. सामाजिक न्याय दिन, आरक्षण, समता, आणि बंधुता या मुद्यांवर महाराजांचे कार्य यावर महत्वपूर्ण माहिती उपस्थितांना दिली.

या वेळी राष्ट्रीय लहू शक्ती खारघर व अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव मंडल अध्यक्ष प्रदीप शेलार, उपाध्यक्ष शिवा कसबे, सचिव नारायण उबाळे, सदस्य हनुमंत पवार, ज्येष्ठ कार्यकर्ते धनंजय आवळे, जयदीप समुद्रे, विजय घार्गे, मधुकर शिंदे, नारायण चव्हाण, प्रदीप सोमवंशी आदींसह सेक्टर १२ मधील अनेक नागरिक उपस्थित होते.



## निवडक

### सारळ येथे रक्तदान शिबिर



**अलिबाग** : संत निरंकारी मिशनच्या सारळ शाखेतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये १६० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन स्वेच्छेने रक्तदान केले. शिबिराला आमदार महेंद्र दळवी यांनी सदिच्छा भेट दिली व संत निरंकारी मिशनचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्‌गार काढले. या वेळी अलिबाग सेक्टर संयोजक विजय आहेर, खरसई ४०-अ झोनचे झोनल प्रमुख प्रकाश म्हात्रे, सारळ ब्रँच मुखी देवानंद पाटील, कोप्रोली सरपंच योगिता पाठारे, जिल्हा शासकिय रक्तपेढीचे अधिकारी डॉ. दिपक गोसावी आणि त्यांचे कर्मचारी, पोयनाड मुखी मा. ही. पाटील, भीलजी मुखी सुरेश गावंड उपस्थित होते. सर्व रक्तदात्यांचे रक्तपेढीकडून प्रमाणपत्र व संत निरंकारी मिशनकडून निरंकारी साहित्य, पुष्प देऊन आभार मानण्यात आले.

### पळसदरीत विद्यार्थ्यांना साहित्यवाटप

**कर्जत** : राजमाता जिजाऊ फाउंडेशनच्या माध्यमातून छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. त्या वेळी पळसदरी ग्रामपंचायतीमधील आठ गावांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. राजमाता जिजाऊ फाउंडेशनच्या अध्यक्षा पूजा प्रताप सुर्वे यांच्या माध्यमातून दरवर्षी असा उपक्रम केला जातो. या भागात जिल्हा परिषद शाळेत शिकणारे विद्यार्थी हे प्रामुख्याने आदिवासी समाजाचे आहेत. त्यांना शैक्षणिक साहित्याची मदत देताना सुवर्णा सुर्वे, कांचन देशमुख तसेच शाळांमधील शिक्षक पूजा पवार, साबळे, दरेकर, छाया जाधव आणि पालक उपस्थित होते.

### ईदनिमित्त मुस्लिम बांधवांची तयारी

**माणगाव** : ईद-उल-जुहा म्हणजेच बकरी ईद गुरुवारी (दि. २९)सर्वत्र साजरी केली जाणार आहे. या ईदची जोरदार तयारी मुस्लिम बांधवांकडून करण्यात आली आहे. रमजान ईदनंतर दोन महिन्यांनी बकरी ईद येते. या बकरी ईदला अल्लाहच्या नावाने बोकडांवर दिल्या जाणाऱ्या कुर्बानीमुळे विशेष असे महत्त्व आहे. रमजान ईदप्रमाणेच बकरी ईद अत्यंत उत्साहात मुस्लिम बांधव साजरी करणार आहेत. माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील जामा मशिदीत बकरी ईदची नमाज सकाळी ७:३० वाजता होणार असल्याचे या मोहल्ल्याचे अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजिते यांनी सांगितले.

# आपत्तीचा सामना करण्यासाठी रायगडात यंत्रणा सज्ज

## ३०० प्रशिक्षित आपदा मित्र तसेच नोडल ऑफिसर नियुक्त

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्यात येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी रायगड जिल्हा आपत्ती निवारण यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्ह्यात ३०० प्रशिक्षित आपदा मित्र तसेच नोडल ऑफिसर नेमण्यात आले आहेत. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील प्रमुख नद्यांना पूर येतो. परिणामी महाड, रोहा, पेण, माणगाव, कर्जत आदी शहरांमध्ये पूरस्थिती निर्माण होते. म्हणून जिल्हा प्रशासनाने रबरी बोट दिल्या आहेत. एक बोट महाड नगरपालिका, तर एक बोट रायगड जिल्हा पोलीस प्रशासनाला देण्यात आली आहे. महाड तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागात २० ठिकाणी अलर्ट सिस्टीम यंत्रणा उभारण्यात आली आहे. महाड शहराजवळून जाणाऱ्या नदीवर दोन ठिकाणी रिव्हर लेव्हल गेज बसविण्यात आले आहेत.

पोलीस विभागाची वायरलेस यंत्रणा, हॅम रेडिओ आदींच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय, संबंधित तहसीलदार कार्यालयांमध्ये संपर्क व्यवस्था अबाधित राखण्याचे नियोजन करण्यात आले आहे. माथेरान, रायगड किल्ला, महाड गणेश टेकडी या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे रिपीटर स्टेशन उभारण्यात येत असून महाड उपविभागामध्ये वायरलेस कम्युनिकेशन यंत्रणा उभारण्यात येत आहे. जिल्ह्यातील ८२ महसूल मंडळ केंद्रांवर स्वयंचलित हवामान केंद्र बसविण्यात आली आहेत. महाड तालुक्यात २६ पर्जन्यमापक यंत्रे बसविण्यात आली आहेत. मोबाईल टॉवरला अखंडित वीजपुरवठा होण्यासाठी जनरेटरची सुविधा पुरविण्यात येणार आहेत. तातडीने संपर्क करता यावा, यासाठी २१ सॅटेलाईट फोन उपलब्ध करण्यात आले आहेत.

पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी रायगडची आपत्ती निवारण यंत्रणा सज्ज झाली आहे. २११ दरडग्रस्त गावांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे. ३०० प्रशिक्षित आपदा मित्र नेमण्यात आले आहेत. सर्व गावांमध्ये नोडल ऑफिसर नेमण्यात आले आहेत. प्रशासनातर्फे गावांमध्ये बैठका घेऊन माहिती देण्यात आली आहे. पावसाळ्यात संभाव्य आपत्ती लक्षात घेऊन जिल्हा ॲक्शन प्लॅन तयार केला आहे.

आपत्ती निवारणासाठी अपेक्षित असणारे साहित्य तालुका आपत्ती निवारण यंत्रणांकडे सुपूर्द करण्यात आले आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील प्रमुख नद्यांना पूर येतो. यामुळे महाड, रोहा, पेण, माणगाव, खालापूर, कर्जत, पनवेल आदी शहरांमध्ये पूरस्थिती निर्माण होते. यासाठी जिल्हा प्रशासनाने सहा रबर बोट दिल्या आहेत. एक बोट महाड नगरपालिका तर एक बोट रायगड जिल्हा पोलीस प्रशासनाला देण्यात आली आहे. महाड तालुक्यातील ग्रामीण आणि शहरी भागात २० ठिकाणी अलर्ट सिस्टीम उभारण्यात आली आहे. महाड शहराजवळून जाणाऱ्या नदीवर दोन ठिकाणी रिव्हर लेव्हलगेज बसवण्यात आले आहेत.

पोलीस विभागाची वायरलेस यंत्रणा, हॅम रेडिओ आदींच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय, संबंधित तहसीलदा कार्यालयांमध्ये संपर्क व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले आहे. माथेरान, रायगड किल्ला, गणेश टेकडी महाड या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे रिपीटर स्टेशन उभारण्यात येत असून, महाड उपविभागामध्ये वायरलेस कम्युनिकेशन यंत्रणा उभारण्यात येत आहे.

जिल्ह्यातील ८२ महसूल मंडळ केंद्रांवर स्वयंचलित हवामान केंद्र बसवण्यात आली आहेत. महाड तालुक्यात २६ पर्जन्यमापक यंत्र बसवण्यात आली आहेत. मोबाईल टॉवरला अखंडित वीजपुरवठा होण्यासाठी जनरेटरची सुविधा पुरवण्यात येणार आहेत. तातडीने संपर्क करता यावा, यासाठी २१ सॅटेलाईट फोन उपलब्ध करण्यात आले आहेत.

### *जिल्ह्यातील २११ दरडग्रस्त गावांना सतर्कतेचा इशारा*

*रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात सहा, मुरूड सहा, पेण १०, पनवेल तीन, उरण एक, कर्जत चार, खालापूर आठ, रोहा १६, सुधागड तीन, माणगाव सात, श्रीवर्धन सात, म्हसळा सहा, महाड ७५, पोलादपूरमध्ये ५९ गावे दरडप्रवण आहेत. या सर्व गावांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे. या गावांना भेटी देऊन कोणती खबरदारी घ्यावी, याची माहिती देण्यात आली आहे, असे रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी सांगितले.*

## कृषी संजीवनी सप्ताहातून जनजागृती

**मुरूड : प्रतिनिधी**

चोरढे येथे कृषी संजीवनी सप्ताहाचा शुभारंभ उपविभागीय कृषी अधिकारी अलिबाग कैलास वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतच उत्साहात झाला. या वेळी तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ, मंडळ कृषी अधिकारी विश्वनाथ अहिरे, कृषी पर्यवेक्षक सैंदाणे, कृषी सहाय्यक विशाल चौधरी, आदिराज चौलकर व बचतगट महिला आदी उपस्थित होते.



उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे यांनी सद्यस्थितीत आहारात पौष्टिक तृणधान्याचे महत्त्व स्पष्ट करून नाचणी, वरीसारखे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे, असे आवाहन केले, तसेच काजू विकास धोरणांतर्गत काजू लागवड योजना, मग्रारोहयो अंतर्गत फळबाग लागवड योजना आदी योजनांविषयी मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी मनिषा भुजबळ यांनी, भातलागवड सुधारीत पद्धत, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अपघात योजना, पीएम एफएम ई योजना आदी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले, तर पीएम किसान योजनेंतर्गत ज्या शेतकऱ्यांचे ई-केवायसी करणे प्रलंबित आहे, त्यांनी सामाईक सुविधा केंद्र येथे ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन केले.

मंडळ कृषी अधिकारी विश्वनाथ आहिरे यांनी, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती अभियानांतर्गत सेंद्रीय शेतीकडे वळून सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे गट तयार करून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

## पतसंस्थांची स्वायत्तता टिकली पाहिजे -डॉ. अशोक मोडक

**अलिबाग : प्रतिनिधी**



पतसंस्था चळवळ ही सर्वसामान्यांची चळवळ आहे. या सर्वसामान्यांना अर्थसाक्षर करण्याचे काम पतसंस्था करतात. त्यामुळे त्यांची स्वायत्तता टिकली पाहिजे, असे मत छत्तीसगड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अशोक मोडक यांनी व्यक्त केले.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या सहकार दर्शन पाक्षिकाच्या सहाव्या वर्धापन दिन कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अशोक मोडक बोलत होते. 'सहकार दर्शन'च्या विशेषांकाचे प्रकाशन या वेळी करण्यात आले. आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्यांचा सत्कार डॉ. अशोक मोडक यांच्या हस्ते करण्यात आला.

सर्वसामान्य नागरिक विश्वासाने आपले पैसे पतसंस्थांमध्ये ठवेत असतात. त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका. विश्वास हा सहकाराचा आत्मा आहे. तो जपला पाहिजे. सहकारात काम करताना नैतिकता महत्वाची असते. पतसंस्थांमधून दिनदुबळ्यांचे कल्याण करण्याचा प्रयत्न करायला हवा. स्वहिताचा विचार न करता जनहिताचा विचार केला पाहिजे, असे डॉ. अशोक मोडक म्हणाले.

सहकार दर्शनचे संपादक नंदकुमार चाळके यांनीही आपले विचार व्यक्त केले. कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश पाटील व संस्थापक गिरीश तुळपुळे यांनी आभार प्रदर्शन केले.

# पावसाळ्यात नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्या

## मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पावसाचे आगमन झाले असून, पावसाळ्यात नागरिकांना आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रत्येकाने वैयक्तिक स्वच्छतेसह आपल्या परिसरातही स्वच्छता राहील, याची काळजी घ्यावी, पाणी उकळून प्यावे, साथीच्या आजाराची लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार सुरू करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

पावसाळ्यात पिण्याचे पाणी काही कारणाने दूषित झाल्यास कॉलरा, विषमज्वर, गॅस्ट्रो, हगवण अशा आजारांचा प्रादुर्भाव होतो, तसेच उघड्यावरील खाद्यपदार्थांवर माशा बसून ते दूषित झाल्यास उलट्या, जुलाब, कावीळ असे आजार होतात. याबाबत काही लक्षणे आढळल्यास त्वरीत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा इतर शासकीय रुग्णालयांमध्ये जाऊन उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

पावसाळ्यात उद्‌भवणारे आजार टाळण्यासाठी नागरिकांनी पाणी उकळून प्यावे, शुद्धीकरण न केलेले बोअरवेल किंवा विहिरीचे पाणी तसेच उघड्यावरील खाद्यपदार्थ खाणे टाळावे, पाणीस्त्रोतांचा परिसर स्वच्छ ठेवावा, यासह इतर सूचना जिल्हा परिषद प्रशासनाने केल्या आहेत.

### काय करावे :

*पिण्याचे पाणी उकळून थंड झाल्यावर शक्य असल्यास त्यात क्लोरिनचा वापर करून पिण्यास वापरावे. अन्नपदार्थ व्यवस्थित झाकून ठेवावेत. उलट्या, जुलाब, काविळ, गॅस्ट्रो, विषमज्वर झाल्यास त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार सुरू करावेत. जिल्हा परिषदेच्या व शासकीय रुग्णालयांमध्ये उपचाराची सोय उपलब्ध आहे. ताप, मळमळ, चक्कर, उलटी, हगवण आदी गॅस्ट्रोची लक्षणे आढळल्यास रुग्णाला त्वरीत ओआरएस पाजावे व त्वरीत डॉक्टरांकडे जाऊन उपचार घ्यावेत. प्रत्येकाने वैयक्तिक स्वच्छतेचे पालन करावे. नागरिकांनी आपल्या घरातील व सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा.*

### काय करू नये :

*शुद्धीकरण न केलेल्या बोअरवेल, विहिरीचे पाणी पिऊ नये. शिळे किंवा उघड्यावरचे माशा बसलेले अन्नपदार्थ खाऊ नयेत. उघड्यावर विकले जाणारे खाद्यपदार्थ खावू नयेत. ताप, मळमळ, चक्कर, उलटी, हगवण आदी गॅस्ट्रोची लक्षणे आढळल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये.*

## माथेरानमध्ये जोरदार पाऊस



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

मागील पाच दिवसांपासून माथेरानमध्ये पावसाने दमदार हजेरी लावली असून संततधार सुरुच आहे. बुधवारी एकूण ५६.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. याठिकाणी जून महिन्याच्या अखेरीस पावसाने दमदार बॅटिंग सुरू केली असून पावसात चिंब भिजण्याचा आनंद घेताना पर्यटक दिसत आहेत. हौशी पर्यटक हे घोडेस्वारीच्या माध्यमातून पॉईंट्सची सैर करताना दिसत आहेत, तर काही बाजारपेठ मध्ये गरमगरम मका, चहाभजीचा आस्वाद घेण्यात मग्न आहेत.

# पावसाळ्यातील चविष्ट व लज्जतदार मुठ्यांना मागणी वाढली

**पाली : प्रतिनिधी**


पाऊस काही दिवसांपूर्वी सुरू झाला आहे. अशावेळी नव्याने बाहेर पडणारे मुठे खवय्यांना आकर्षित करीत आहेत. कोवळ्या गवतावर गुजराण करणारे आणि फक्त पावसाच्या सुरुवातीलाच मिळणाऱ्या पौष्टीक आणि चविष्ठ मुठ्यांना मागणी वाढत आहे.



सध्या सर्वत्र मुठे उपलब्ध आहेत. विकत आणण्यापेक्षा अनेकजण मुठे पकडणे पसंत करतात. मुठे विकून अनेकांच्या हातालादेखील दोन पैसे मिळतात. शहरात १२० ते १०० रुपये डझनावर मुठे मिळतात.

पहिल्या पावसात उगवलेले कोवळे गवत खाण्यासाठी मुठे बाहेर पडतात. माळरान, शेत, डोंगर, ओहळ, नदी आणि खाडीच्या किनारी मुठे सापडतात. रात्रीच्या वेळी रिमझिम पावसात हे मुठे गवत खाण्यासाठी बाहेर पडतात. कोवळे गवत आपल्या नांग्यांनी तोडून बिळात नेऊन निवांत खातात.

रात्रीच्या वेळी रिमझिम पाऊस पडू लागल्यावर मुठे पकडण्यासाठी खवय्ये बाहेर पडतात. हातात गॅसबत्ती, टॉर्च किंवा जळता टायर घेतला जातो सोबत मुठे ठेवण्यासाठी सिंमेटची पोती किंवा गोणपाट असते.



**पावसाळ्यात सापडणारे मुठे चविष्ठ असतात. मुठे खाण्यासाठी पावसाची वाट पाहत असतो. खवय्यांना नेहमीच त्यांचे आकर्षण असते. पावासाळा सुरू झाल्यावर या मुठ्यांना पकडण्यासाठी मित्रांसोबत जातो. शहरातील खवय्यांकडूनदेखील मुठ्यांना खूप मागणी असते.**

**-प्रवीण यादव, खवय्ये व मुठे पकडणारे**

### आकर्षक रंग आणि ठेवण

*इतर खेकड्यांपेक्षा आकाराने लहान असलेल्या मुठ्यांचा रंग तजेलेदार काळ व पिवळा असतो. पाठीचा भाग थोडा गोलाकार वर आलेला असतो. त्याचा रंग काळापिवळा चकाकणारा असतो. पाय व नांगे पांढरे-पिवळे तजेलेदार असतात. एक नांगा मोठा तर एक छोटा असतो. या सर्व वैशिष्ट्यांमध्ये इतर खेकडे आणि चिंबोऱ्यांमध्ये ते उठून दिसतात.*

रात्रभर माळरान, शेत, गवताळ भाग किंवा डोगरउतारवर फिरून मुठे पकडले जातात.

आकाराने लहान असल्या तरी त्यांचे मांस चविष्ट व आरोग्यवर्धक असते. मुठे वेगवेगळ्या प्रकारे आणि पद्धतीने बनवून खाल्ले जातात.

# परदेशी शिक्षणाची संधी मिळवून देणारी शिष्यवृत्ती योजना

**कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकास प्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. हे लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे थेट लाभ मिळावेत, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी..! हा एक महत्वाकांक्षी विशेष उपक्रम हाती घेतला आहे.**

या उपक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांची जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसिद्धी करण्यात येत असून काय आहेत शासकीय योजना.. जाणून घेऊया या लेखातून...



समाजाचा सर्वांगिण विकास झाल्याशिवाय कोणताही देश प्रगत होऊ शकत नाही. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वंचित, मागास, आर्थिक दुर्बल घटकांना शिक्षित करणे व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक ठरते. गरीब व वंचित घटकांतील विद्यार्थी अनेकदा गुणवत्ता असूनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत शैक्षणिक भत्ते, शिष्यवृत्ती व योजनांची सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे अंमलबजावणी केली जाते.




सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागासवर्गीय समाजास मुख्य प्रवाहात आणून सर्वांगीण विकासासाठी आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासाच्या अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजना अधिकाधिक लोकाभिमुख होण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना ही शासनाची महत्त्वाची योजना आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेणे कठीण असते. अशा विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून ही राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती दिली जाते.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी.) उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदत देणे हा या योजनेचा उद्देश आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ७५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. योजनेसाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना विमान प्रवास भाडे, परदेशातील शैक्षणिक संस्थेची शिक्षण फी, निर्वाह भत्ता, आकस्मिक खर्च याचा लाभ योजनेतून दिला जातो. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे कमाल वयोमर्यादा असते. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या संकेतस्थळावरील एमडी, एमएस अभ्यासक्रम प्रवेशासाठी पात्र आहेत. विद्यापीठांच्या रँकिंगमध्ये ज्या परदेशी विद्यापीठांचे रँकिंग ३००पर्यंत आहे, त्याच विद्यापीठात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ही योजना देय आहे.

**अर्ज कुठे करावा** : विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरील रोजगार या लिंकवरून डाऊनलोड करून घ्यावा. परिपूर्ण अर्ज समाजकल्याण आयुक्तालय, ३, चर्चपथ, पुणे ४११००१ या पत्त्यावर पाठवावा.

**अर्ज करण्यास मुदतवाढ**

वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळवून देणारी ही महत्वपूर्ण योजना आहे. परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची मुदत २० जूनपर्यंत होती. ती आता ५ जुलैपर्यंत वाढविण्यात आली आहे.

**-मनोज शिवाजी सानप, जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग**

# आशिया अजिंक्यपद कबड्डीत भारताचा विजय

## दक्षिण कोरिया आणि तैपेई संघावर वर्चस्व

**बुसान : वृत्तसंस्था**

गतविजेत्या भारताने आशिया अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत सलामीच्या दिवशी दोन शानदार विजय मिळवले. दक्षिण कोरिया आणि तैपेई संघावर आपले वर्चस्व सिद्ध केले. इराणनंतर कोरियाचा संघ ताकदवान समजला जातो, पण भारतीय खेळाडूंसमोर कोरियाचा संघ निष्प्रभ ठरला. भारताने ७६-१३ अशा फरकाने मिळवलेल्या विजयात महाराष्ट्राच्या अस्लम इनामदारने सुपर १० अशी कामगिरी केली. नवीन कुमारऐवजी बदली खेळाडू म्हणून त्याला खेळवण्यात आले होते.



भारतीयांनी सलग नऊ गुण मिळवत जोरदार सुरुवात करताना पहिल्या अर्धात ४०-४ अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धातही हेच वर्चस्व कायम राखताना तब्बल ७६ गुणांची कमाई केली. यादरम्यान भारताने कोरियावर पाच लोण दिले. सुरजित नरवालने पकडीत छाप पाडली. त्याने सात गुण मिळवले.

दुसऱ्या सामन्यात भारतीयांनी तैपेईविरुद्ध सावध सुरुवात केली तरी ५३-१९ असा एकतर्फी विजय मिळवला. सचिन तन्वरने अष्टपैलू खेळ केला. कोरियाच्या तुलनेत तैपेईचे खेळाडू बऱ्यापैकी लढा देत होते. पहिल्या अर्धात ते केवळ तीन गुणांनीच पाठी होते, मात्र कर्णधार पवन शेरावतने १२व्या मिनिटाला त्यांच्यावर लोण दिला आणि भारताची आघाडी १४-६, २१-१२ अशी केली.

तैपेईच्याच्या बचाव खेळाडूंनी उत्तरार्धात भारतीयांच्या पकडी करण्याचा प्रयत्न केला, परंतु अनुभवात उजवे असलेल्या भारतीय चढाईपटूंनी गुणफलक सतत हलता ठेवला आणि तीन लोण दिले. बुधवारच्या आणखी एका सामना इराणने तैपेईवर ५२-२८ असा विजय मिळवला. सुरुवातीला तैपैईने आघाडी घेतली होती, मात्र त्यानंतर इराणने आपली ताकद दाखवली. भारताचा गुरुवारी इराणशी सामना होणार आहे.

# वर्ल्डकपबाबत सेहवागचे भाकित

## सेमीफायनलच्या चार संघांचा वर्तवला अंदाज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी २०२३ एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. क्रिकेटच्या या महाकुंभाचा पहिला सामना ५ ऑक्टोबर रोजी इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. त्याच वेळी ही स्पर्धा १५ ऑक्टोबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. दरम्यान, भारताचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागने उपांत्य फेरीत पोहचणाऱ्या चार संघांबाबत मोठी भविष्यवाणी केली आहे.


२०२३च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या शेड्यूल लॉन्चिंग कार्यक्रमादरम्यान आयसीसीचे सीईओ ज्योफ अलर्डिस, बीसीसीआय सचिव जय शाह, श्रीलंकेचा माजी




दिग्गज फिरकी गोलंदाज मुथय्या मुरलीधरन आणि माजी स्फोटक सलामीवीर वीरेंद्र सेहवाग उपस्थित होते. लाँचिंग इव्हेंटमध्येच सेहवागने उपांत्य फेरीत पोहचणाऱ्या संघांबाबत वक्तव्य केले.

आयसीसीच्या या कार्यक्रमात सेहवागने सांगितले की, या वेळी वर्ल्ड कपमध्ये कोणते चार संघ सेमी फायनलमध्ये प्रवेश करतील? हे जरी सांगणे जरी कठीण असले तरी माझ्या मते भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड उपांत्य फेरी गाठतील. सेहवागच्या मते, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे संघ उपांत्य फेरीत पोहचू शकतात, कारण त्यांचे खेळाडू थेट आक्रमक फलंदाजी करतात आणि काही आयपीएलमध्येदेखील खेळले आहेत.

# नीरज चोप्रा वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये खेळणार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाचा गोल्डन बॉय आणि ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रा हंगेरी येथे २०२३च्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारताचे नेतृत्व करणार आहे. ही स्पर्धा १९ ऑगस्ट ते २७ ऑगस्टदरम्यान खेळली जाणार आहे. जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या इतिहासात भारताने केवळ दोन पदके जिंकली आहेत.

नीरज चोप्रा २०२२ यूजीनमध्ये रौप्य पदक जिंकणारा पहिला भारतीय ठरला. यापूर्वी २००३मध्ये, अंजू बॉबी जॉर्जने महिलांच्या लांब उडीत स्पर्धेत चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी पहिले पदक जिंकून इतिहास रचला होता. जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप पात्रता प्रक्रियेत नीरज चोप्रा गेल्या वर्षी लॉसने डायमंड लीगमधील स्पर्धेसाठी पात्र ठरला.

नीरज चोप्रा हा हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरत आहे. तो ३० जून रोजी लुसाने येथे होणाऱ्या डायमंड लीगमध्ये पुनरागमन करेल अशी अपेक्षा आहे. दुखापतीमुळे तो एफबीके गेम्स आणि पावो नूरमी गेम्सला मुकला होता. दोहा डायमंड लीगमध्ये अव्वलस्थान मिळवल्यानंतर त्याने २०२३मध्ये चांगली सुरुवात केली होती.

# मेस्सी म्हणतो, विक्रमाकडे लक्ष केंद्रित करीत नाही!

**ब्यूनस आयर्स : वृत्तसंस्था**

लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो हे नक्कीच या पिढीतील सर्वोत्तम फुटबॉलपटू आहेत, जिथे त्यांचे रेकॉर्ड्स त्याच्या कर्तृत्वाबद्दल बोलतात. त्याच वेळी, दोघांच्या चाहत्यांची संख्यादेखील खूप जास्त आहे आणि त्यांची वारंवार एकमेकांशी तुलना केली जाते. अशातच मेस्सीने एक प्रतिक्रिया दिली आहे.

लिओनेल मेस्सी किंवा ख्रिस्तियानो रोनाल्डो या महाद्वीपावर नसल्यामुळे युरोपियन फुटबॉल चाहत्यांची पुढील हंगामात निराशा होईल. २०२२च्या फिफा विश्वचषकानंतर रोनाल्डो सध्या अल नासेरसोबत सौदी



अरेबियात आहे. दोन्ही खेळाडू करिअरच्या शेवटच्या टप्प्यात आहेत, तरीही प्रश्न विचारले जात आहेत. बार्सिलोनाच्या माजी खेळाडूला नुकतेच विचारण्यात आले की रोनाल्डोचा विक्रम मोडणे त्याच्यासाठी महत्त्वाचे आहे का? यावर बीआयएन स्पोर्ट्शी बोलताना तो म्हणाला, नाही, थोडेसे. मी आधी म्हटल्याप्रमाणे, माझ्या करिअरच्या या टप्प्यावर मी आता यावर लक्ष केंद्रित करीत नाही.

तो पुढे म्हणाला, अर्जेंटिना आणि क्लब स्तरावर मी काय साध्य करू शकतो यावर मी लक्ष केंद्रित करतो, जिथे मी यूसीएल किंवा क्लब विश्वचषक, लीग, चषक यासारखी महत्त्वाची विजेतपदे जिंकण्यासाठी भाग्यवान होतो.

मेस्सीने युरोपला निरोप दिला असून तो फुटबॉल इतिहासातील महान खेळाडूंपैकी एक म्हणून ओळखला जातो. त्याने विक्रमी सात बॅलन डी'ओर पुरस्कार आणि विक्रमी सहा युरोपियन गोल्डन शूज जिंकले आहेत. मेस्सीने शीर्ष पाच युरोपियन लीगमध्ये सर्वाधिक गोल करणारा ख्रिस्तियानो रोनाल्डोचा विक्रमही मोडला.

मेस्सी म्हणाला, मी खूप भाग्यवान होतो की मी सर्वकाही जिंकले आणि माझ्या कारकिर्दीच्या शेवटी असेच होईल. अर्थात तुमच्याकडे उद्दिष्टे आणि रेकॉर्ड आहेत, परंतु, मला वाटते त्या चांगल्या विश्वासाव्यतिरिक्त, त्या दुय्यम आहेत.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे गोव्यात ऑक्टोबरमध्ये उद्घाटन

**पणजी : वृत्तसंस्था**

गोव्यातील नियोजित ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या तारखांवर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. स्पर्धेचे २५ ऑक्टोबरला उद्घाटन होईल आणि १६ दिवसीय स्पर्धेचा ९ नोव्हेंबर रोजी समारोप होईल, अशी माहिती क्रीडामंत्री गोविंद गावडे यांनी दिली.

स्पर्धेच्या उद्घाटनाविषयी आम्हाला पंतप्रधान कार्यालयाने एक निश्चित तारीख पाठवण्यास सांगितले होते. आम्ही २५ ऑक्टोबरला तारीख ठरवली आणि पंतप्रधान कार्यालयाशी पत्रव्यवहार केला. स्पर्धेची सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून सज्जतेच्या दिशेने आहे, असे क्रीडामंत्री गावडे यांनी सांगितले. स्पर्धेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी करण्याचे संकेत आहेत.

भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या (आयओए) स्पर्धा तांत्रिक समितीचे प्रमुख अमिताभ शर्मा यांनीही स्पर्धेचे २५ ऑक्टोबरला उद्घाटन होण्याबाबत दुजोरा दिला. दसरा आणि दिवाळी यामधील कालावधीत स्पर्धेचे आयोजन व्हावे, यासाठी आमचे प्रयत्न होते आणि त्यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे, असे अमिताभ म्हणाले. यासंदर्भात त्यांनी ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व राष्ट्रीय क्रीडा महासंघाच्या अध्यक्ष, सचिवांना स्पर्धेच्या नियोजित तारखेविषयी पत्र पाठवले आहे. स्पर्धेचे सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

# विशेष ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणाऱ्या खेळाडूंचे पंतप्रधानांकडून अभिनंदन



**बर्लिन : वृत्तसंस्था**

स्पेशल ऑलिम्पिक समर गेम्समध्ये भारताचे प्रतिनिधित्व करीत ७६ सुवर्ण पदकांसह २०२ इतर पदके जिंकणाऱ्या खेळाडूंचे पंतप्रधानांनी अभिनंदन केले आहे. पंतप्रधान मोदींनी ट्वीट करून या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

स्पेशल ऑलिम्पिक वर्ल्ड गेम्स ही जगातील सर्वात मोठी सर्वसमावेशक क्रीडा स्पर्धा आहे, जी खास दिव्यांगांसाठी आयोजित केली जाते. यामध्ये हजारो दिव्यांग खेळाडू सहभागी होतात. १७ ते २५ जून या कालावधीत विशेष ऑलिम्पिक जागतिक खेळ बर्लिन येथे पार पडला आणि प्रथमच जर्मनीमध्ये देखील हा खेळ खेळवण्यात आला, यामध्ये ७६ सुवर्ण पदकांसह एकूण २०२ पदकं भारतीय खेळाडूंनी जिंकले. भारतासाठी खेळणाऱ्या या सर्व खेळाडूंनी देशाचे नाव उंचावले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटलं आहे की, बर्लिनमधील स्पेशल ऑलिम्पिक समर गेम्समध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि ७६ सुवर्ण पदकांसह २०२ पदके जिंकणाऱ्या भारताच्या अतुलनीय खेळाडूंचे अभिनंदन. त्यांच्या यशामध्ये आम्ही सर्वसमावेशकतेची भावना साजरी करतो आणि या उल्लेखनीय खेळाडूंच्या चिकाटीचं कौतुक करतो.

भारताने स्पेशल ऑलिम्पिक वर्ल्ड गेम्स २०२३चा शेवटचा दिवस त्यांच्या पदकांची संख्या २०२पर्यंत नेऊन पूर्ण केला. बर्लिनमध्ये शहराच्या मध्यभागी असलेल्या ब्रँडेनबर्ग गेटवर या सर्व खेळाडूंचा पारितोषिक वितरण उत्साहात पार पडला. भारताने या खेळात ७६ सुवर्ण, ७५ रौप्य आणि ५१ कांस्यपदकांसह शेवटची पदके ॲथलेटिक्स ट्रॅकमधून मिळवली आहेच. भारतीय खेळाडूंनी ट्रॅक इव्हेंटमधून (दोन सुवर्ण, तीन रौप्य आणि एक कांस्य) सहा पदके मिळविली आहेत.

# ऑलिम्पिकमध्ये प्रसिद्धी कांबळेला सुवर्णपदक

**मुंबई : प्रतिनिधी**

चेंबूरमधील प्रसिद्धी कांबळे हिने सध्या बर्लिन येथे सुरू असलेल्या स्पेशल ऑलिम्पिकमध्ये स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी करून भारताला गोल्ड मेडल मिळवून दिले आहे. या कामगिरीमुळे प्रसिद्धीचे व तिच्या शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रसिद्धीचे वडील ऑटो रिक्षा चालवतात, तर आई घरकाम करते. चेंबूरमधील रहिवाशांनी या कामगीरीसाठी तिचा भव्य सत्कार करीत मिरवणूक काढली.

चेंबूरमधील पंचशील नगरमध्ये भाड्याच्या खोलीत राहणारी प्रकाश आणि सुषमा कांबळे यांच्या मुलीने देशाचे नाव मोठे केले आहे. वडिलांनी तिला स्पेशल सुलभा शाळेत दाखल केले, मात्र शाळेतील क्रीडाशिक्षक सुनील आडे व प्रिन्सिपल अनुराधा जठार यांनी प्रसिद्धीची खेळातील आवड पाहून तिच्याकडून स्विमींगची प्रॅक्टीस करवून घेतली.

आपल्या मुलीची आवड पाहून वडिलांनी पदरमोड करीत प्रसिद्धीला घाटकोपर येथील ओडियन तरण तलाव व नंतर चेंबूर येथील जनरल अरुणकुमार वैद्य तरण तलावात प्रशिक्षणासाठी घेऊन जात होते. पोहण्यातील तिची प्रगती बघून क्रीडाशिक्षक आणि प्राचार्यांनी तिला बर्लिन येथे सुरू असलेल्या स्पेशल ऑलिम्पिक भाग घेण्याकरिता तयारी करून घेतली घेतली.

बर्लिन इथल्या स्पेशल ऑलम्पिक स्पर्धेसाठी प्रसिद्धीची निवड झाली. २१ जून रोजी झालेल्या स्पेशल ऑलिंपिक स्विमिंग स्पर्धेमध्ये वैयक्तिक गटात २५ मीटर फ्रीस्टाइलमध्ये तिने देशाला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. यामध्ये शाळेचा वाटा आणि आई-वडिलांची मेहनत असल्याचे ती सांगते. सरकारने तिला पुढील वाटचाली करिता मदत करण्याची आशा तिच्या वडिलांनी व्यक्त केली आहे, तर देशासाठी गोल्ड आणि सिल्वर मेडल जिंकल्याचा मला सार्थ अभिमान असल्याची प्रतिक्रीया प्रसिद्धी कांबळेने व्यक्त केली आहे.

# लॉर्ड्स कसोटीत नॅथन लायनने रचला इतिहास

## ऑस्ट्रेलियासाठी १०० कसोटी सामने खेळणारा ठरला तिसरा खेळाडू



**लंडन : वृत्तसंस्था**

लॉर्ड्सवर इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात शेस मालिकेतील दुसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यात नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. या सामन्यात मैदानात उतरताच नॅथन लायनने ऑस्ट्रेलियासाठी इतिहास रचला आहे. ऑस्ट्रेलियाकडून सलग १०० कसोटी सामने खेळणारा तो तिसरा खेळाडू ठरला आहे. यासोबतच सलग १०० कसोटी सामने खेळणारा तो एकूण सहावा खेळाडू ठरला आहे.

डेली मेलशी बोलताना नॅथन लायन म्हणाला, मला याचा खूप अभिमान आहे, पण मला ट्रेंट ब्रिजचा तो दिवस चांगला आठवतो. जेव्हा मला सांगण्यात आले की मी खेळत नाही. मला फक्त इतके आठवते की, मी त्या दिवशी ब्रॅड हॅडिनच्या पलंगावर बसून याबद्दल बोलत होतो. नॅथन लायनला २०१३च्या शेस मालिकेची आठवण झाली. ज्यामध्ये त्याला संघातून वगळण्यात आले होते आणि त्याच्या जागी युवा श्टन आगरला खेळण्याची संधी दिली गेली होती. त्या दिवसाबद्दल नॅथन म्हणाला की, मला वाटले की माझे करिअर संपले आहे आणि त्या वेळी माझ्या मनात अनेक विचार सुरू होते.

२०१३मध्ये त्याला संघातून वगळण्यात आलेला दिवस आठवून नॅथन लायन म्हणाला की, जेव्हा तुम्हाला संघातून वगळले जाते, तेव्हा खूप विचित्र भावना असते. विशेषत: जेव्हा तुम्ही आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत नवीन असाल. त्यावेळी तुमचं करिअर संपलं असं वाटतं. आता पुढे काय करणार? माझे कुटुंब अजूनही माझ्यावर प्रेम करेल का? त्या वेळी असे विचार मनात येत राहतात.

# चाहत्याने धोनीला चक्क रक्ताने लिहिले पत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट टीमचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीचे जगभरात लाखो चाहते आहे. आता धोनीच्या एका चाहत्याने चक्क रक्ताने पत्र लिहिले आहे आणि एक खास मागणी केली आहे. सध्या हे प्रकरण सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत आहे.

धोनीचे चाहते नेहमी त्याच्यासाठी स्पेशल गोष्टी करीत असतात. आयपीएल सुरू असतानाही चाहते सातत्याने सोशल मीडियावर धोनीविषयी आपले प्रेम व्यक्त करीत होते. आता तर एका चाहत्याने कहर केला आहे. चक्क धोनीला रक्ताने पत्र लिहिले आहे. या पत्रात त्याने धोनीला आमंत्रण पाठविले आहे. या चाहत्याने लिहिले आहे, आय लव्ह यू माही, तुला भीलवाडा येथे आयोजित टूर्नामेंट कार्यक्रमाला यायचे आहे.

पत्र लिहिणाऱ्या या चाहत्याचे नाव विजेश कुमार आहे. विजेश लहानपणापासून धोनीचा फॅन आहे. लहानपणापासून त्याने धोनीला खेळताना पाहिले आहे. येत्या ७ जुलैला धोनीचा वाढदिवस आहे. या वाढदिवशी विजेशला धोनीसाठी काही खास करायचे आहे, त्यामुळे विजेशने भीलवाडा येथे धोनीच्या वाढदिवसानिमित्त टूर्नामेंटचे आयोजन केले आहे. या टूर्नामेंटचे नाव हॅप्पी बर्थडे वर्ल्ड कप ठेवले आहे.

धोनीच्या या चाहत्याची सोशल मीडियावर चांगलीच चर्चा सुरू आहे. धोनी या चाहत्याची ही खास मागणी पूर्ण करणार का आणि या टूर्नामेंटमध्ये हजेरी लावणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# राउंड रॉबिन पद्धतीने होणार यंदाचा विश्वचषक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकाच्या वेळापत्रकाची मंगळवारी घोषणा करण्यात आली आहे. राउंड रॉबिन आणि नॉकआउट पद्धतीने दहा संघामध्ये ही स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. प्रत्येक संघाला नऊ सामने खेळावे लागणार आहेत. वनडे क्रिकेट विश्वचषकात तिसऱ्यांदा राउंड रॉबिन पद्धतीने स्पर्धा होत आहे. याआधी २०१९ आणि १९९२मध्ये राउंड रॉबिन आणि नॉकआउट पद्धतीने विश्वचषक स्पर्धा झाली होती. २०१९मध्ये इंग्लंडने तर १९९२मध्ये पाकिस्तानने विश्वचषक उंचावला होता.




राउंड रॉबिन आणि नॉकआउट पद्धतीने सर्वात आधी १९९२मध्ये विश्वचषक स्पर्धा झाली होती. राउंड रॉबिन पद्धत म्हणजे, या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक संघाची एकमेकांशी लढत होते. यात कोणत्याही संघाला कमी किंवा जास्त करता येत नाही. प्रत्येक संघाला त्यांची ताकद अजमावण्याची संधी मिळते. भारत, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पाकिस्तान या संघांना दावेदार मानले जात आहे, मात्र बांगलादेश, अफगाणिस्तान अथवा इतर कोणताही कमकुवत संघ टॉप ४मध्ये पोहचू शकतो. सेमी फायनलमध्ये पोहचल्यानंतर नॉकआऊट पद्धतीने सामने होतील. पहिल्या क्रमांकावर असणारा संघ चौथ्या स्थानावर असलेल्या संघासोबत खेळेल तर दुसऱ्या क्रमांकाचा संघ तिसऱ्या संघासोबत खेळेल. त्यानंतर विजेत्या दोन संघामध्ये फायनलचा थरार रंगेल.

राउंड रॉबिन पद्धतीने झालेल्या विश्वचषकात भारतीय संघाची कामिगिरी निराशाजनक आहे. १९९२मध्ये पहिल्यांदा राउंड रॉबिन स्पर्धा रंगली होती, तेव्हा भारतीय संघाला टॉप ४मध्ये स्थान पटकावता आले नव्हते, तर २०१९मध्ये भारतीय संघाचे आव्हान उपांत्य फेरीत संपुष्टात आले होते. न्यूझीलंडने भारताचा पराभव करत फायनलमध्ये धडक मारली होती. यंदा भारतामध्येच विश्वचषक स्पर्धा रंगणार आहे, त्यामुळे टीम इंडिया कशी कामगिरी करतेय, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

जीवेत् शरदः शतम्!
अमित पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
शिवकुमार त्यागी